सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १६ एप्रिल २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## आता टोलनाके राहणार नाहीत, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा; १५ दिवसात येणार नवी पॉलिसी

मुंबई : केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी मुंबईतील दादर येथे डॉ. बाबासाहेबांच्या स्मृतीला अभिवादन करुन अमर हिंद मंडळाच्या ७८व्या व्याख्यानमालेत उपस्थितीत दर्शवत मार्गदर्शन केले. बाबासाहेबांचे जीवन सामाजिक आर्थिक समतेसाठी महत्त्वाचे आहे. कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी लोकप्रबोधन महत्त्वाचे आहे, विचारमंथन आवश्यक आहे. पण, आपल्या देशात विचार भिन्नतेपेक्षा विचारशून्यता असल्याची खंत गडकरी यांनी व्यक्त केली. येथील वाख्यानमालेत बोलताना त्यांनी देशभरातील रस्ते, पूल, टोलनाके आणि भावी प्रकल्पांबाबत माहिती दिली. तर, टोलबाबत मी जास्त सांगणार नाही, पण तुम्हाला लवकरच १५ दिवसांच्या आत अशी पॉलिसी येईल, की टोलबाबत तुमची कोणतीही तक्रार राहणार नाही, अशी केंद्रीय मंत्री गडकरींनी घोषणाच केली.

टोलबाबत मी जास्त सांगणार नाही, पण तुम्हाला लवकरच १५ दिवसांच्या आत अशी पॉलिसी येईल, की टोलबाबत तुमची कोणतीही तक्रार राहणार नाही. पण मी महाराष्ट्राच्या टोलबाबत बोलत नाही, छक्कख राष्ट्रीय महामार्गाबाबत बोलतोय, असे नितीन गडकरी यांनी म्हंटल. आता टोलनाके राहणार नाहीत, पण सॅटेलाईट सिस्टीमद्वेरा तुम्ही तिथून निघाल्यानंतर तुमच्या नंबरप्लेटवरुन तुमच्या बँक अकाऊंटमधील पैसे कपात होतील, अशी माहिती देखील नितीन गडकरी यांनी दिली. तसेच, पुढच्या २ वर्षात इंडियन रोड इनफ्रा अमेरिकेपेक्षा चांगले राहील असेही ते म्हणाले. तसेच, मुंबई–गोवा महामार्ग जून महिन्यापर्यंत पूर्ण होणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केले.

टोलनाक्यांवरील रांगा कमी करण्याकरता सरकार पातळीवर अनेक उपाययोजना आणल्या जात आहेत. त्याकरता फास्ट टॅग पद्धत अनिवार्य करण्यात आली आहे. फास्टटॅगकरताही टोलनाक्यावर गाड्यांना बराच काळ रांगेत उभे रहावे लागते. यासाठी देशातील टोलनाकेच आता बंद व्हावेत, याकरता केंद्र सरकारने नवी यंत्रणा राबवण्याचा विचार केला आहे. असे केंद्रीयमंत्री गडकरी यांनी सांगितले आहे. ते पुढे म्हणाले, सॅटलाईट बेस फ्री टोलिंग सिस्टिम तयार करतोय. यामुळे टोलनाके राहणार नाहीत. तुम्हाला कोणी अडवणार नाही. कॅमेऱ्याद्वारे तुमच्या नंबरप्लेटवरून टोल निघेल. तुम्ही जिथून निघालात तिथपासून तुम्ही जिथून बाहेर पडाल तिथपर्यंतचाच टोल थेट तुमच्या बँक खात्यातून कापला जाणार आहे. तसेच या नवीन धोरणात, सरकार लोकांना तीन हजार रुपयांमध्ये फास्टॅग रिचार्ज करण्याची सुविधा देणार आहे. त्यानंतर त्यांना पुढील एक वर्षासाठी कोणत्याही टोल प्लाझावर कर भरावा लागणार नाही असे त्यांनी सांगितले.

## हनुमान जयंती उत्सवात धुडगूस घालणाऱ्या ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल; एक अल्पवयीन

संगमनेर : संगमनेर शहरातून हनुमान जयंतीच्या दिवशी निघालेल्या हनुमान रथाला रोखत धुडगूस घालणाऱ्या ११ जणांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवार दि. ११ आणि शनिवार दि. १२ एप्रिल रोजी घडलेल्या या दोन्ही घटना प्रकरणी मंगळवार दि. १४ एप्रिलला रात्री उशिराने हा गुन्हा दाखल करण्यात आला असून यामध्ये एक अल्पवयीन मुलगा आहे.

याबाबत शहर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, कमलाकर विश्वनाथ भालेकर (वय ६२, धंदा निवृत्त, रा. चंद्रशेखर चौक, संगमनेर) हे श्रीरामनवमी आणि हनुमान जयंती उत्सव समितीचे उपाध्यक्ष आहेत. यावर्षी ११ एप्रिल २०२५ रोजी रात्री ९:०० वाजता हनुमान जयंती उत्सवात सलामीचे वादन सुरू असताना विनायक पुंडलिक गरुडकर, सौरभ रमेश उमरजी, शेखर शिवाजी सोसे, अमोल दशरथ क्षीरसागर, श्याम मधुकर नालकर, सोनू गोविंद नालकर (सर्व रा. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांनी भैरवनाथ ढोलताशा पथक आणून वाजवण्यास सुरुवात केली.

त्यावेळी ड. गिरीश मेंद्रे यांनी त्यांना ही सलामी होऊ द्या, मग तुमचे वादन करा, असे सांगितल्यावर या सहा जणांनी वाद घालत शिवीगाळ आणि धक्काबुक्की केली व विनायक गरुडकर याने योगराज कुंदनसिंग परदेशी यांच्या पोटात लाथ मारली. तर सौरभ उमरजी याने चेतन तारे याच्यावर चाकू हल्ला करण्याचा प्रयत्न केला. अमोल क्षीरसागर याने कमलाकर भालेकर यांना अरेरावी करत उद्या सकाळी तुम्ही चौकातून रथ कसा काढतात तेच बघतो अशी धमकी दिली. तर आरोपी सोनू नालकर याने मारण्याची धमकी दिली. शेखर सोसे याने किशोर उर्फ शुभम चंद्रकांत लहामगे यांच्या डोक्यात फायटरने वार केला जो त्यांनी चुकवल्याने खांद्याला लागला. श्याम नालकर याने श्यामसुंदर रामेश्वर जोशी यांनाही धमकी दिली.

## यंदा देशात सरासरीपेक्षा अधिक, तब्बल १०५ टक्के पाऊस पडणार!

नवी दिल्ली : शेतकऱ्यांसह संपूर्ण देशवासीयांसाठी दिलासादायक बातमी! भारतीय हवामान विभागाने जाहीर केलेल्या अंदाजानुसार यंदा देशात मोसमी पाऊस सरासरीपेक्षा १०५ टक्के अधिक पडण्याची शक्यता आहे. एल निनो स्थिती निष्क्रिय असून, पावसाला अनुकूल वातावरण असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम. रविचंद्रन, हवामान विभागाचे प्रमुख मृत्युंजय महापात्रा, आणि शास्त्रज्ञ आर. के. जेनामणी यांच्या उपस्थितीत आयोजित पत्रकार परिषदेत हा हवामान अंदाज जाहीर करण्यात आला.

पावसाचे अंदाजित चित्र

जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात १०५% सरासरीहून जास्त पाऊस पडेल.

एल निनो अथवा ला निना यापैकी कोणतीही स्थिती सध्या सक्रीय नाही; दोन्ही महासागरांतील स्थिती तटस्थ व पावसाला पोषक आहे.

युरोशिया आणि हिमालयातील बर्फाच्छादनही यंदा कमी आहे – जी एक पावसास अनुकूल बाब मानली जाते. गेल्या ५० वर्षांचा सरासरी पाऊस ८७ सेमी असून, यंदा त्यात ५% वाढ होण्याची शक्यता आहे.

कोणत्या भागात काय स्थिती?

देशाच्या बहुतांश भागात पावसाची स्थिती अनुकूल असेल. मात्र लडाख, ईशान्य भारत आणि तामिळनाडू या भागात पावसाचे प्रमाण थोडकं राहण्याची शक्यता आहे.

उष्णतेच्या लाटा व दुष्काळाची शक्यता

हवामान विभागाने यासोबतच एप्रिल ते जून या कालावधीत अनेक भागात तीव्र उष्णतेच्या लाटा आणि काही ठिकाणी दुष्काळसदृश परिस्थिती उद्भवण्याची शक्यता देखील वर्तवली आहे.

शेतीसाठी सकारात्मक संकेत

या अंदाजामुळे देशातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. खरिपाच्या पिकांची पेरणी आणि उत्पादन दोन्ही वाढण्याची शक्यता असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला याचा सकारात्मक फायदा होणार आहे.

## पाच हजारांची लाच स्वीकारताना ग्रामसेवक अटक

तभा वृत्त सेवा

हिंगोली, १५ एप्रिल : यातील तक्रारदार हे ग्रामपंचायत आडोळ चे सदस्य असून, त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सन २०१९-२० अंतर्गत अहिल्याबाई होळकर सिंचन योजनेतून विहीर मंजूर झाली होती. या विहीर बांधकामाकरिता तक्रारदार यांना सदर योजनेअंतर्गत २ लाख ९९ हजार रुपये मंजूर झाले होते. त्याप्रमाणे सदर विहिरीचे बांधकाम पूर्ण केलेले असून आज पर्यंत तक्रारदार यांना २,०१,९२४/- रुपये रक्कम अदा करण्यात आले आहे. त्यांचे कुशलचे बिल ( शेवटचा हप्ता ) येणे बाकी आहे, तसेच त्यांचे चुलत काका यांचे जनावराच्या गोठ्याचे शेडचे काम पूर्ण झालेले असून, त्यांचे देखील कुशलचे बिल ( शेवटचा हप्ता ) येणे बाकी आहे. तसेच तक्रारदार यांचे दुसरे चुलत काका यांचे यापूर्वी ग्रामसेवक मोहन गणपत जाधव यांच्याकडे दाखल केलेल्या घरकुलाच्या प्रस्तावावर ग्रामसेवक यांची सही करून घरकुलाचा प्रस्ताव पंचायत समिती, सेनगाव येथे पाठविणे बाकी होते.

त्या अनुषंगाने तक्रारदार हे त्यांचे कुशलचे बिलावर व त्यांचे चुलत काका यांचे कुशलच्या बिलावर तसेच त्यांचे दुसरे चुलत काका यांचे घरकुलाच्या प्रस्ताव सही करून घरकुलाचा प्रस्ताव पंचायत समिती सेनगाव येथे पाठविणे असल्याने दिनांक ०२ /०४/ २०२५ रोजी लोकसेवक जाधव ग्रामसेवक यांना भेटून नमूद कुशल बिलावर व घरकुलाच्या प्रस्तावावर सही करण्यासाठी विनंती केली. तेव्हा लोकसेवक जाधव हे तक्रारदार यांना म्हणाले की, तुम्ही तुमचे व तुमच्या काकाच्या कुशलच्या बिलाचे प्रत्येकी ३०००/- रुपये व तुमच्या दुसऱ्या काकाच्या घरकुलाच्या प्रस्तावाचे २०००/- रुपये असे एकूण ८०००/- रुपये मला आणून द्या,तरच मी तुमचे व तुमच्या काकाच्या कुशल बिलावर व तुमच्या दुसऱ्या चुलत काकांच्या घरकुलाच्या प्रस्तावावर सह्या करतो. असे म्हणून ८०००/- रुपये लाचेची मागणी केली आहे. अशी तक्रार दि.०२/०४/२०२५ रोजी प्राप्त झाली होती.

दिनांक ०२/०४/२०२५ रोजी सदर तक्रारीची पंचा समक्ष पडताळणी केली असता, यातील लोकसेवक जाधव (ग्रामसेवक )यांनी तक्रारदार यांना त्यांचे कुशलचे बिलावर व त्यांचे चुलत काका यांचे कुशलचे बिलावर सही करण्यासाठी प्रत्येकी तीन हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडअंती दोघात तीन हजार रुपये लाचेची मागणी केली . तसेच तक्रारदार यांचे दुसरे चुलत काका यांचे घरकुलाच्या प्रस्तावावर सही करून सदरचे प्रस्ताव पंचायत समिती सेनगाव येथे पाठविण्याकरिता २०००/- रुपये लाचेची मागणी केली. असे एकूण ५०००/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी करून,लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवली.

आज दिनांक १५/०४/ २०२५ रोजी तक्रारदार हे लाचेची रक्कम लोकसेवक जाधव यांना देण्यासाठी त्यांचे सेनगाव येथील खाजगी रूमवर गेले. तेव्हा तक्रारदार यांनी कामासंबंधी बोलणी केली असता, लोकसेवक जाधव हे तक्रारदार यांना पेमेंट आणलं का असे म्हणून लाचेची रक्कम रूम मधील फरताळावर ठेवण्यास सांगून, सदर लाचेची रक्कम ५०००/- रुपये स्वीकारले. त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले आहे.

आरोपीची पथकाने अंगझडती करीत रोख ३०७०/- रू,एक पिवळ्या धातूची अंगठी अंदाजे पाच ग्राम ,तसेच ेिंकंपनीचे -९ मॉडेलचा मोबाईल पथकाने जप्त केली आहे. लोकसेवक जाधव ग्रामसेवक यांचे विरुद्ध पो. स्टे. सेनगाव येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदरील कारवाई उप अधीक्षक विकास घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रफुल अंकुशकर , पोलीस निरीक्षक, -डख युनूस शेख ,पोह/ ज्ञानेश्वर पंचलिंगे, भगवान मंडलिक, राजाराम फुपाटे, गजानन पवार, तानाजी मुंडे, रवींद्र वरणे, गोविंद शिंदे, मपोह/ योगिता अवचार पो.अं.वाघ चापोह शेख अकबर सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी केली आहे.

## चिकाळा येथील ५५ वर्षीय नराधमाविरुध्द पोस्कोचा गुन्हा; अनैतिक संबंधातून मुलगी जन्मल्याचे प्रकरण

**तभा वृतसेवा**

**तामसा, दि.१३ एप्रिल-**

हदगाव तालुक्यातील चिकाळा येथील एका ५५ वर्षीय नराधमाने १७ वर्षाच्या अल्पवयीन मुलीशी वारंवार ठेवलेल्या अनैतिक संबंधातून मुलगी जन्मल्याच्या आरोपाखाली पिडीतेच्या तक्रारीवरुन तामसा पोलीस ठाण्यात दि. १४ रोजी सोमवारी रात्री उशीरा गुन्हा दाखल आहे. घडलेल्या घटनेमुळे तामसासह हदगाव तालुक्यात खळबळ उडाली असून गुन्हा करणारा व प्रकरण दाबण्यासाठी मदत करणारे दोघेही गावातील राजकीय क्षेत्रातील नामांकित व्यक्ती असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे.

चिकाळा येथील पिडीतेचा मामा मरण पावरल्याने तिची आई मामाच्या गावी गेली होती. वडील व भाऊ शेतातील विहीर खोदकामसाठी मजुरीला गेले होते. घरी कोणीच नसल्याचे पाहून गावातील आरोपी बाबुराव तुपेकर हा गेल्या वर्षीच्या जून महिन्यापासून पिडीतेला अनैतिक संबंधासाठी प्रयत्न करीत होता. त्याला पीडीतेने प्रतिसाद देत नसल्याचे पाहून नराधमाने शेवटी जबरदस्तीने थंड पाण्यात दारू व गुंगीचे औषध देऊन अत्याचार केला. सतत दोन महिन्यात वारंवार ठेवलेल्या अनैतिक संबंधातून पीडिता गर्भवती राहिली. या प्रकरणाची गावभर चर्चा वाढत होती. गर्भधारणेनंतर घरी परतलेल्या आईला पीडितेने हा सगळा प्रकार सांगितला. पीडितेच्या कुटुंबीयांनी तिला नांदेडच्या विष्णुपुरी येथील शासकीय दवाखान्यात नेल्यानंतर प्रसूतीसाठी नेले असता मागील महिन्यात पीडितेला मुलगी झाली. प्रकरण अंगलट येणार म्हणून आरोपीने नामुष्की टाळण्यासाठी दबावतंत्राचा वापर करून आर्थिक आमिष दाखवून जन्मलेली मुलगी विष्णुपुरी येथील दवाखान्यातील एका सिस्टरच्या नातेवाईकांना दिली. आरोपींनी गावातील बाबुराव चोंडे नावाच्या व्यक्तीमार्फत पीडिता व कुटुंबीयांना एक लाख रुपये देऊन प्रकरण दाबून टाकण्याचा प्रयत्न केला. १४ रोजी सोमवारी झालेल्या अन्यायाविरुद्ध तक्रार देण्यासाठी पीडिता एकटीच पोलीस ठाण्यात दाखल झाली. रात्री गुन्हा दाखल होताच पोलीसांनी आरोपी अटक केली. या प्रकरणामुळे तामसा व परिसर चांगलाच हादरला आहे. हे गंभीर प्रकरण दाबून टाकण्यासाठी आरोपीला मदत करणारा सहआरोपी बनणार का ? याकडे परिसराचे लक्ष लागले आहे. पिडीतेच्या फिर्यादीमधील बाबुराव चोंडे नामक व्यक्ती कोण ? याची चर्चा वाढली आहे. पुढील तपास पोलीस उपाधीक्षक डॅनियल बेन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर, फौजदार बालाजी नरवटे करीत आहेत.

**त्या सिस्टर कोण ?**

तामसा पोलीस ठाण्याअंतर्गत सलग तीन महिन्यात पोस्कोचे तीन गुन्हे दाखल होण्यामुळे या भागात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. नव्हे तर तामसा पोलिसांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे तीनही पोस्कोतील आरोपीचे वय पन्नाशीच्या वरच आहे. या प्रकरणातील जन्माला आलेली नवजात मुलगी ज्या सिस्टरकडे ठेवली त्या सिस्टर कोण ? व नवजात अर्भकाचा शोध पोलीस घेणार का? याची उत्सुकता वाढली आहे.






## पैठणला ११० पैकी ५६ गावांच्या सरपंचपदासाठी महिला राज

तभा वृत्तसेवा

पैठण दि १५ :- पैठण तालुक्यातील ११० ग्रामपंचायत सरपंच पदांसाठी एसडीएम नीलम बाफना, तहसीलदार दिनेश झांपले यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयात आरक्षण सोडत काढण्यात आली ज्यात ११० पैकी ५६ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी वेगवेगळ्या प्रवर्गातील महिलांचे आरक्षण काढण्यात आले आहे. सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीत अनेकांनी देव पाण्यात ठेवले असतांना.यात काहींना समाधान तर काहींचा हिरमोड झाला.



पैठण मतदारसंघातली ११० ग्रामपंचायत सरपंच पदासाठी तहसील कार्यालयात आरक्षण सोडत ठेवण्यात आली होती. शाळकरी मुलांच्या हस्ते सरपंच आरक्षण सोडतीच्या चिठ्ठ्या काढून आरक्षण सोडत पार पडली . ज्यात अनुसूचित जाती महिला राखीव ब्रह्मगव्हाण,दाभरुळ,दरेंगाव, आनंदपूर,निलजगांव,गेवराई बुद्रुक, मावसगव्हाण,नानेगांव. अनुसूचित जाती आगरनांदूर,पोरंगाव, शेकटा, कारकीन,कडेठाण खुर्द, लाखेगाव, खेर्डा, केकदजळगाव. अनुसूचित जमाती महिला राखीव चणकवाडी आणि धनगांव. अनुसूचित जमाती बाभूळगांव. ओबीसी महिला राखीव देवगांव, फारोळा,ब्रह्मगांव,पारुंडी तांडा, पारुंडी, नांदलगांव, कातपुर,चितेगाव, सालवडगांव,कौडगांव,कौदर कुतुबखेडा,हर्षी खुर्द, शेवता, आखातवाडा,टाकळी पैठण. ओबीसी जांभळी, ढाकेफळ,मुलानी वाडगांव, दादेगाव बुद्रुक,हिरडपुरी, वरूडी बुद्रुक, पाडळी गाझीपूर,इंदेगाव, बालानगर,चांगतपुरी,दिंन्नापूर,खादगांव, पाचोड खुर्द, कृष्णापुर. सर्वसाधारण महिला राखीव दादेगांव जहागीर, रजापूर,नांदर, सोमपुरी, नवगाव, वडजी,कावसन जुने, टाकळी अंबड, लोहगाव बुद्रुक, तोंडोळी,गाडेगांव पैठण, नायगाव, हर्षी बुद्रुक, रांजणगांव खुरी, पाचलगांव,बिडकीन, हिरापूर, कुरणपिंप्री,७४ जळगाव, पाचोड बुद्रुक, तांडा बुद्रुक, कापूसवाडी,लिमगांव,राहटगांव,ढोरकीन,गेवराई बार्शी, आडुळ बुद्रुक, आपेगांव, पांगारा, ईसारवाडी,वाहेगांव. सर्वसाधारण दावरवाडी,सोनवाडी बुद्रुक, विहामांडावा, मुरमा, रांजणगाव दांडगा, कडेठाण बुद्रुक, तांदूळवाडी,आडगाव जावळे, एकतुनी, आलियाबाद,चिंचाळा,धुपखेडा, पैठणखेडा,ईमामपूर,बोकुड जळगांव, मुधळवाडी,घारेगांव, सोलनापूर, आवडे उचेंगांव, आडूळ खुर्द, डोंनगांव, वरवंडी खुर्द, आंतरवालीखांडी,म्हारोळा, तारू पिंपळवाडी,वडवाळी, नारायणगांव,पाटेगांव, पिंपळवाडी पिराची, कोळी बोडखा, थेरगांव याप्रमाणे सरपंच पदासाठी आरक्षण निघाले.उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांच्या निरीक्षणाखाली तहसीलदार दिनेश झांपले यांनी आरक्षण सोडत काढली.यावेळी नायब तहसीलदार विष्णू पुरी , महसूल सहाय्यक अमोल पाखरे , रेवनाथ खेडकर ,दादासाहेब गटकळ , सोमनाथ कोल्हे , इम्रान शेख आदींनी सहकार्य केले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष असले पाहिजे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ एप्रिल -** दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद शिक्षण संस्थांतर्गत सर्व महाविद्यालयाच्या वतीने, दयानंद कला महाविद्यालयाचे प्रा डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, कार्यालयीन अधिक्षक संजय व्यास यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी डॉ.अंजली जोशी यांनी आपल्या मनोगतात असे प्रतिपादित केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानाचे प्रतीक होते. कारण ते तासनतास पुस्तके वाचत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्राध्यापक, पत्रकार, लेखक, विचारवंत, थोर समाजसुधारक, राजकारणी, अर्थतज्ज्ञ, कृषितज्ज्ञ, सर्वच धर्माचे अभ्यासक अशी ख्याती असणारे सर्वस्पर्शी सर्वगुणसंपन्न महापुरुष होते म्हणून त्यांना संपूर्ण विश्वात सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून ओळखले जाते. यामधून विद्यार्थ्यांनी, प्राध्यापक तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांचा आदर्श व प्रेरणा घेतली पाहिजे.

भारतरत्न, बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य दलित, शोषित, पीडित माणसांना माणसात आणण्यासाठी व त्यांना शासनकर्ती जमात होण्यासाठी वेचले आणि त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणले. असे यावेळी ते म्हणाले. यावेळी दयानंद शिक्षण संस्थांतर्गत येणारे सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## आमदार देशमुखांच्या हस्ते विकासकामांचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ एप्रिल -** माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते सोमवारी बाभळगाव येथील वैशालीनगर येथील मौलाना वस्तीतील आमदार निधीतून तयार करण्यात आलेला सिमेंट कॉंक्रीट रस्ता, गणेश मंदिरजवळील दत्ता जाधव ते साहेबराव मस्के यांच्या घरापर्यंतचा सिमेंट कॉंक्रीट रस्ता, ग्रामपंचायत कार्यालयाच्या सोलार प्रकल्पाचे लोकार्पण, ऑनलाइन करप्रणाली व नागरी सुविधा संकेत स्थळाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी विलास बँकेचे उपाध्यक्ष समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे, बाभळगावच्या सरपंच प्रिया मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख, ग्रामसेवक शंकर भोसले, सचिन मस्के, राम स्वामी, अनिल मरके, जहांगीर सय्यद, मौलाना हाफीज शकूरसाब, मौलाना इनाम साब, मौलाना मुफ्तीअली, मौलाना रियाजसाब, मुजाहिद साब,शबीर शेख, उमाकांत मस्के, जहांगीर पठाण, भरत सावळे, वसंत मस्के, सुजीत सलगरे यांच्यासह बाभळगाव ग्रामपंचायतचे सदस्य, नागरिक, काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## ठाकरे शिवसेनेच्या वतीने डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १४ एप्रिल -** शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लातूर येथे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यासंगी जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, सहसंपर्कप्रमुख नामदेव



चाळक, महानगरप्रमुख सुनिल बसपुरे, युवा सेनेचे राहुल मातोळकर, विधानसभाप्रमुख एस आर चव्हाण, अल्पसंख्याक सेनेचे मुनीरभाई शेख, माजी उपजिल्हाप्रमुख शंकर रांजणकर, कामगार सेनेचे तानाजी करपुरे, शहर समन्वयक राजू कतारे, शहर संघटक दिलीप भांडेकर, शिवराज मुळावकर,योगेश सिरसाट, उपशहरप्रमुख भास्कर माने, राहुल रोडे, योगेश पाटील आदी उपस्थित होते.

## दयानंद विज्ञानमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १४ एप्रिल -** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्रमुख पाहुणे म्हणून आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले आणि संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.तसेच थोर समाजसुधारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित ऑनलाईन प्रश्नमंजुषाही घेण्यात आली.या प्रश्नमंजुषेकरिता विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यासंगी पर्यवेक्षिका डॉ. संध्या वाडीकर,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे,सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे,तारासिंग ठाकूर यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.त्यांनीही विनम्र अभिवादन केले.

# डॉ. आंबेडकर यांच्या अभिवादनासाठी जनसागर उसळला



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ एप्रिल -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आ. अमित देशमुख आणि खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी सकाळी शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जाऊन त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. दरम्यान डॉ. आंबेडकर पार्क येथे त्यांना अभिवादन करण्यासाठी जनसागर उसळला.

यावेळी भंते पय्यानंद थेरो, भंते बुद्धशील, भंते बोधिराज, माजी आमदार त्र्यंबक भिसे, किरण जाधव, लक्ष्मण कांबळे, डॉ. बाबासाहेब अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे यांच्यासह अन्य मान्यवरांनी तूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जाऊन त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी समद पटेल, विजय देशमुख लक्ष्मण कांबळे मोहन माने, कैलास कांबळे, चंद्रकांत चिकटे, आतिश चिकटे, पृथ्वीराज शिरसाट, राजू गवळी, मोहन सुरवसे, गोपाळ बुरबुरे, राजा माने, राज क्षीरसागर, सचिन बंडापले, अनंतराव देशमुख, बाबासाहेब गायकवाड, प्रवीण कांबळे, आशाताई चिकटे, शारदा हजारे, नागसेन कामेगावकर, सहदेव मस्के, राजकुमार पाटील, रविशंकर जाधव, हरीराम कुलकर्णी, यशवंतराव पाटील, आयुब मणियार, धनंजय शेळके, यशपाल कांबळे, बाबा पठाण, व्यंकटेश पुरी, चंद्रकांत धायगुडे, प्रवीण सूर्यवंशी, अक्षय मुरळे, शरद देशमुख, सुमित खंडागळे, विजयकुमार सोबदे, राम स्वामी, हरिभाऊ गायकवाड, अनिलकुमार माळी, एकनाथ पाटील, बिभीषण सांगवीकर, तबरेज तांबोळी, गोरोबा लोखंडे, रविशंकर जाधव, पंडित कावळे, राजकुमार पाटील, विष्णुदास धायगुडे, ॲड अंगद गायकवाड, अभिजीत इगे, पवनकुमार गायकवाड, आदीसह भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूरचे विविध पदाधिकारी, कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात महामानवाला अभिवादन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ एप्रिल -** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यामंदिरात जयंतीनिमित्त सोमवारी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी बौध्द धम्म चळवळीला प्रेरणा दिली. अस्पृश्यांवर होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांचे कार्य पाहता त्यांचा जन्मदिन जागतिक शिक्षकदिन म्हणून पाळला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## श्री. देशिकेंद्र विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ एप्रिल -** येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेद्वारा संचलित श्री देशिकेंद्र विद्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी आदिनाथ सांगवे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.या कार्यक्रमास संस्थेचे संचालक बसवराज येरटे,विद्यालयाचे मुख्याध्यापक रुपसिंग सगर, उपमुख्याध्यापक शिवानंद स्वामी, पर्यवेक्षक पुष्पा पाटील,विलास शेळके, कल्पना देवगुंडे, मनोज दानाई सह विद्यालयातील सर्व शिक्षक -शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



## 'सामाजिक समरसता मंच' च्यावतीने २४ तास अखंड संविधान वाचन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ एप्रिल -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त पददलीत समाजापुरते मर्यादीत महापुरुष नसुन ते समस्त भारतीयांचे आहेत. त्यांनी निर्माण केलेले संविधान सर्व भारतीयांसाठी उपयुक्त ठरले आहे. बाबासाहेब सर्व भारतीयांसाठी आदर्श आहेत.

हा संदेश देण्यासाठी व संविधानाचा विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचवीण्याच्या उद्देशाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सामाजिक समरसता मंच च्यावतीने लातूरातील छत्रपती चौक येथे भारतीय संविधानाचे २४ तास अखंड वाचन उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमास लातूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

भारतीय संविधानाचे सलग २४ तास वाचन या उपक्रमाचे उद्घाटन दयानंद महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. दिलीप नागरगोजे व अनिल अंधोरीकर यांच्या हस्ते करण्यात आले तर समारोप सौ. सिमा आयाचित, विश्वनाथ जाधव यांनी केला.

शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असा संदेश देणारे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न प.पू डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सामाजिक समरसता मंच लातूर च्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये लातूर शहरात नागरिकांना सरबत, पिण्याचे पाण्याचे वाटप करण्यात आले. तसेच १५ एप्रिल रोजी सकाळी निर्माल्य सफाई करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सामाजिक समरसता मंच दरवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विविध सामाजीक उपक्रम राबवून अनोख्या पध्दतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात येते.

या उपक्रमास लातूरकरांसोबतच भिम अनुयांयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. संजय कांबळे, राजन शिंदे आदिंनी परिश्रम घेतले.

## कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ एप्रिल -** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, शिक्षण विभाग माध्यमिक महाराष्ट्र आणि महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शासनाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. महावीर कटके यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अंगद कोते, स्टाफ सचिव डॉ. जयदेवी पवार, प्रा. विवेक कदम, प्रा. हरिहर गायके, दत्ता फुलगामे, माजी विद्यार्थी इरफान शेख, अमित कटारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी डॉ. अभिजीत बादाडे, बाळासाहेब देशमुख, डॉ.शाहूराज मुळे, प्रा. बालिका गौंड, प्रा. नंदा खरटमल, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.दशरथ भिसे, डॉ. मा.ना. गायकवाड, डॉ.रणजीत जाधव, प्रा. संदीप पान चेवले, अंकुश थडकर, प्रा. चंद्रकांत मोरे, प्रा. ज्ञानदेव कांबळे, प्रा. संतोष कल्याणकर, प्रा.सोपान डोपे आणि वसंत मस्के यांची उपस्थिती होती.

## तरुणांनी व्यसनाच्या आहारी जाण्याऐवजी अध्यात्माकडे वळण्याची गरज



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ एप्रिल -** आजची तरुणाई सज्जनाची संगत सोडून दुर्जनाच्या विळख्यात सापडून व्यसनाच्या आहारी जाऊन आपले जीवन उध्वस्त करीत आहेत तेंव्हा तरुणांनी व्यसनाच्या आहारी जाण्याऐवजी वाईट प्रवृत्ती पासून दूर ठेवणाऱ्या, मनाला शांती आणि समाधान देणाऱ्या अध्यात्माकडे वळण्याची गरज आहे असे प्रतिपादन आमदार रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या भक्ती भावाच्या वातावरणात बाजार मैदानावर असलेल्या श्री हनुमान मंदिर परिसरातील अखंड हरिनाम सप्ताह व गुरुचरित्र पारायण भागवत कथा ज्ञानयज्ञ सांगता कार्यक्रमात देवाची आळंदी येथील ह.भ.प बाळासाहेब महाराज शिंदे यांचे काल्याचे किर्तन झाले. या कीर्तनास लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड हे आवर्जून उपस्थित होते. यासंगी दहीहंडीचा कार्यक्रम झाला सदरील कार्यक्रमास खरोळा आणि परिसरातील हजारो भावीक भक्त महिला पुरुष उपस्थित होते.

अध्यात्म ही राष्ट्राची शक्ती आणि प्रेरणा आहे अध्यात्मातून मानसिक समाधान लाभते जो मानसिक समाधानी असतो तो सुखी असतो जीवनात अध्यात्माला अन्य साधारण महत्व असून तरुणांच्या जीवनात अध्यात्म ही काळाची गरज असल्याचे सांगून तरुणाची वाटचाल व्यसनाधीन होणार नाही यासाठी पालकांनी दक्ष राहण्याची गरज आहे असे यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले. पांढरी येथील देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यावधीचा निधी मंजूर करून आणला. खरोळा गावातील दत्त मंदिर, वडाची आई यासह विविध देवदेवतांच्या मंदिरांचे जीर्णोद्धार करण्याचे भाग्य मला लाभले. आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने मला विधानसभेत काम करण्याची संधी मिळाली. येत्या काळात खरोळा आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू अशी ग्वाही यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

यासंगी पांढरी येथील ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज आणि बाळासाहेब शिंदे महाराज यांचा आमदार रमेशआप्पा कराड यांनी येथोचीत सत्कार केला. श्रीक्षेत्र हनुमान मंदिरात जाऊन मनोभावे दर्शन घेतले.

यासंगी विक्रमकाका शिंदे, नवनाथ भोसले, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, दशरथ सरवदे, वसंत करमुडे, डॉ. बाबासाहेब घुले, सुधाकर काळे, मोहन राऊतराव, शालीक गोडभरले, रमाकांत फुलारी, ओम चव्हाण, सिद्धेश्वर मामडगे, जयप्रकाश जटाळ, प्रल्हाद फुलारी आदी उपस्थित होते.

## नीलकंठेश्वर प्राण प्रतिष्ठेनिमित्त आयोजित कार्यक्रमास प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ एप्रिल -** चांगले सामाजिक कार्य करत असताना अनेक लोकांचे, दुर्जनांचे घाव झेलावे लागतात. तेंव्हा केवळ दिखाव्यासाठी छप्पन इंचाची छाती देण्यापेक्षा देवा असे घाव झेलण्यासाठी छप्पन इंचाची पाठ दे अशी मागणी ष.ब्र.श्री. १०८ चन्नब महालिंगेश्वर शिवाचार्य महाराज यांनी व्यक्त केली.

ते लातूर तालुक्यातील हरंगुळ बु. च्या मलंग ग्रीन सिटीमध्ये श्री नीलकंठेश्वर प्राण प्रतिष्ठेनिमित्त आयोजित किर्तन व आशिर्वचना प्रसंगी बोलत होते.

या कार्यक्रमात श्री निलकंठेश्वराच्या मूर्तीची तसेच नंदी व श्री गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा सद्गुरू श्री ष.ब्र. १०८ काशिनाथ शिवाचार्य महाराज पाथरीकर (बापू), सद्गुरू श्री म.नि.प्र. मृगेंद्र महास्वामीजी कासारशिरसी मठसंस्थान, तसेच बलतपस्वी सच्चिदानंद सदगुरू श्री.ष.ब्र.१०८ चन्नबस्व महालिंगेश्वर शिवाचार्य महाराज बर्दापूरकर मठसंस्थान बर्दापूर, ता. अंबाजोगाई, जि. बीड यांच्या हस्ते संपन्न झाला.

या किर्तन सोहळ्याला संबोधित करताना श्री ष.ब्र. १०८ काशिनाथ शिवाचार्य महाराज पाथरीकर (बापू) म्हणाले की, मानवी जीवनात आनंद जर कुठे मिळत असेल तर तो भगवंताच्या नाम स्मरणात, आत्म शुध्दी आणि पारमार्थिक अक्षय सुखाच्या प्राप्तीसाठी प्रत्येकाने आपल्या संसाराबरोबरच भगवद् भक्तीच्या मार्गाने मोक्ष प्राप्ती साध्य करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील अनेक भाविक भक्तांनी लाभ घेतला.

## संत श्री आसाराम बापू साधक परिवारातर्फे सोयगाव बसस्थानक येथे पाणपोई सुरू



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ एप्रिल – संत श्री आसाराम बापू साधक परिवारातर्फे अध्यक्ष राजेंद्र आहीरे यांच्या वतीने सोयगाव बसस्थानक येथे मोफत पाणपोई सुरू करण्यात आली.तालुक्यातील खेड्यापाड्यातून येणाऱ्या नागरिकांना शुद्ध व शितल पाण्याची सेवा सुरू केली.दि.१४ सोमवार रोजी सोयगाव बस आगार प्रमुख मनिष जवळेकर,वाहतूक निरीक्षक सतिश अंभोरे व विजय आहीरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.यावेळी सहाय्यक वाहतूक निरीक्षक अशोक काकडे,समाजसेवक संजय शहापूरकर,कृषी भूषण अरुण सोहणी,नगरसेवक तथा पत्रकार राजू दुत्तोंडे,तालुका समादेशक अधिकारी संदीप सुरडकर,राजू बाविस्कर वाहतूक नियंत्रक,ज्ञानेश्वर वाडेकर वाहतूक नियंत्रक,कृष्णा शेवाळकर,पत्रकार रवींद्र काटोले,योगेश बोखारे,संदिप सोहनी,समाजसेवक विष्णू मापारी,समाजसेवक डिंगाबर वाघ,गोंविद आहीरे,अमोल सोहनी,हरीश सोहनी,आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

## फोनपे ने सुरू केली यूपीआई सर्कल सेवा

मुंबई – फोनपेने आज त्यांच्या ॲपवर यूपीआई सर्कल ही नवीन सेवा सुरू केली असल्याची घोषणा केली. यामध्ये वापरकर्त्यांना स्वतःचा सर्कल तयार करून कुटुंबातील सदस्य, मित्र किंवा विश्वासू व्यक्तींसाठी पेमेंट करण्याची सुविधा मिळणार आहे. यूपीआई सर्कलच्या माध्यमातून, ज्यांच्याकडे बँक खाते नाही अशा व्यक्तींनाही स्वतंत्र यूपीआई आयडी तयार करता येईल, ज्यासाठी कोणत्याही लिंक केलेल्या बँक खात्याची गरज नसेल, ज्यामुळे डिजिटल आर्थिक सेवांपासून दूर असलेल्यांनाही व्यक्तींनाही सुरक्षित ऑनलाइन व्यवहाराची संधी मिळेल.

## एल्जीच्या कॉम्प्रेस्ड एअर सिस्टीमसह मॅन+हम्मेल खर्च कमी करते

मुंबई : फिल्ट्रेशन सिस्टम प्रदान करण्यात जागतिक आघाडीच्या मॅन+हम्मेलने एल्जी इक्विपमेंट्स लिमिटेड (बीएसई: ५२२०७४ एन एस ई: एल्जी इक्विपमेंट्स) ची उपकंपनी असलेल्या पॅटन्स इंक., यूएसए सोबत भागीदारीत त्यांच्या कॉम्प्रेस्ड एअर सिस्टममध्ये यशस्वीरित्या सुधारणा केली आहे. एल्जी च्या प्रगत एअर कॉम्प्रेसर आणि ड्रायर्सद्वारे समर्थित या नवीन सिस्टममुळे खर्चात मोठी बचत झाली आहे, उत्पादन कार्यक्षमता सुधारली आहे आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढली आहे, ज्यामुळे मॅन+हम्मेलच्या उत्पादन ऑपरेशन्समध्ये बदल झाला आहे. मॅन+हम्मेल ऑटोमोटिव्ह, शेती, बांधकाम, डेटा सेंटर, ऊर्जा, अन्न आणि पेये आणि इतर अनेक उद्योगांना सेवा देते. कंपनी तिच्या उत्पादन प्रक्रियेत कॉम्प्रेस्ड एअर आणि स्वच्छ पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून होती आणि कालबाह्य आणि अनेकदा दोषपूर्ण एअर कॉम्प्रेशन सिस्टममुळे दररोज २० हून अधिक एअर-संबंधित डाउनटाइम घटना घडल्या आणि तासाला ३० गॅलन दूषित पाणी. यामुळे कंपनीला दरवर्षी १६०,००० पेक्षा जास्त नुकसान सहन करावे लागत होते, ज्यामुळे विलंब होतो, संसाधनांचा अपव्यय होतो आणि पुरवठा साखळीतील अडचणी वाढतात.

## विवोने वी५०ई लॉंच केला

पुणे– जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड विवोने आज त्यांच्या स्टायलिश व्ही मालिकेतील नवीनतम उत्पादन वी५०ई लॉंच केले. उत्कृष्ट डिझाइनसह अत्याधुनिक पोर्ट्रेट वैशिष्ट्यांचे संयोजन करून, वी५०ई सोनी मल्टीफोकल प्रो पोर्ट्रेट कॅमेरा सिस्टम आणि ५०एमपी आय-एएफ ग्रुप सेल्फी कॅमेरासह एक उत्कृष्ट स्मार्टफोन अनुभव प्रदान करते. एक इमर्सिव्ह अनंत पाहण्याचा अनुभव देणारा, हा स्मार्टफोन अल्ट्रा-स्लिम क्वाड-कर्व्हड डिस्प्ले आणि फक्त ०.७३९ सेमी१ आकाराची स्लीक बॉडीसह येतो. स्थानिक ग्राहकांच्या गरजा आणि आवडी निवडी पूर्ण करण्याच्या विवोच्या सततच्या प्रयत्नांना अनुसरून, विवोने व्ही५०ई हा स्मार्टफोन दोन आकर्षक रंगांमध्ये सादर केला आहे – सॅफायर ब्लू आणि पर्ल व्हाइट, जे लक्झरी आणि स्टाइलचा अनुभव देण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. विवो वी५०ई ची किंमत ८जीबी + १२८जीबीव्हेरिएंटसाठी २८,९९९ रुपये (करांसह) आणि ८जीबी + २५६जीबी व्हेरिएंटसाठी ३०,९९९ रुपये (करांसह) असेल. त्याची विक्री १७ एप्रिलपासून विवोच्या अधिकृत वेबसाइट, फ्लिपकार्ट, अमेझॉन आणि सर्व पार्टनर रिटेल स्टोअर्सवर सुरू होईल.

## प्रीहिस्टोरिक ॲडव्हेंचर – डायनासोर वर्ल्ड

या उन्हाळ्यात, फिनिक्स मार्केटसिटीचा मोस्ट अवेटेड इव्हेंट – हॉलिडे लँड आता डायनासोर वर्ल्डच्या माध्यमातून तुम्हाला घेऊन जाणार आहे एका थरारक प्राचीन दुनियेच्या प्रवासावर.. ११ एप्रिल ते ०४ मे २०२५ दरम्यान लिबर्टी स्क्वेअर येथे हा इव्हेंट होणार आहे. हा अविश्वसनीय अनुभव मुलांसाठी आणि कुटुंबांसाठी मौजमस्ती, माहिती आणि ॲडव्हेंचरची मेजवानी घेऊन येणार आहे. डायनासोर वर्ल्ड मध्ये मेसोजोइक युगातील जादू पुन्हा जिवंत केली गेली आहे– ज्यामध्ये टी-रेक्स, ब्रॅकिओसॉरस आणि प्टेरोडॅक्टिल्ससारखे आयकॉनिक डायनासोरस त्यांच्या खऱ्याखुऱ्या आकारामध्ये बघायला मिळणार आहेत. लिबर्टी स्क्वेअर एका प्राचीन जंगलात रूपांतरित झालं आहे जिथे खरेखुरे डरकाळीचे आवाज, सेन्सरवर चालणारे प्राणी आणि संपूर्ण थीमच तुमचा अनुभव अधिक जिवंत आणि थरारक बनवतो.

## शब्बीर अहलूवालिया एका नव्याच अवतारात दिसणार

हलक्या-फुलक्या आणि कौटुंबिक पसंतीच्या मालिका सादर करण्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या सोनी सब वाहिनीने आपल्या 'उफ्फ... ये लव है मुश्किल' या आगामी रोमँटिक कॉमेडी मालिकेचे आकर्षक टीझर जारी केले आहे. विनोद आणि हळुवारपणा यांचे उत्कृष्ट मिश्रण सादर करण्याची हमी देणारी ही मालिका कौटुंबिक जीवनाच्या धमाल गोंधळात प्रेमाची ताकद दर्शविते. या अगळ्यावेगळ्या मालिकेत लोकप्रिय टेलिव्हिजन अभिनेता शब्बीर अहलूवालिया मुख्य भूमिकेत दिसणार आहे. टीझरमध्ये दिसते की, शब्बीरला काहीतरी अगदी वेगळे हवे आहे आणि या नवीन अवतारात त्याला ते नक्कीच मिळाले आहे! आजवर प्राधान्याने तत्वनिष्ठ आणि 'आदर्श' व्यक्तिरेखा साकारणारा शब्बीर यावेळी हा साचा मोडून एका विक्षिप्त, तिरसट आणि काहीशा अजागळ अवतारात दिसणार आहे. प्रेक्षकांनी बराच काळ शब्बीरच्या पुनरागमनाची प्रतीक्षा केली आहे आणि अखेरीस या मालिकेच्या रूपात त्यांची इच्छा पूर्ण होत आहे. 'उफ्फ... ये लव है मुश्किल' हा शब्बीरसाठी देखील एक अगदी वेगळा अध्याय आहे आणि सोनी सबच्या वैविध्यपूर्ण मालिकेत आता एक नवी भर पडत आहे.



## लिलाबाई जावळे; आज अंत्ययात्रा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ एप्रिल : येथील लिलाबाई दगडू जावळे (वय.७५) यांचे अल्पशा आजाराने मंगळवार रोजी दुपारी १:०० वाजता निधन झाले.त्यांचेवर बुधवार सकाळी ९ वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार आहे.ते फौजी गणेश जावळे यांच्या मातोश्री तर विजय जावळे यांच्या काकू होत.

## अक्षय तृतीया निमित्त वार्षिक ओम जगद्गुरु जनशांती धर्म ध्वजारोहण सोहळ्यास भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्या : राजेंद्र पवार



खुलताबाद प्रतिनिधी : ध्वजारोहण सोहळा दि. २० एप्रिल रोजी रविवार सकाळी. १० , वाजा दरम्यान श्री क्षेत्र श्री संत जनार्दन स्वामी आश्रम वेरूळ तालुका खुलताबाद (. रत्नपुर )जि छत्रपती संभाजीनगर ओम निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरी जी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व उत्तराधिकारी अध्यात्म शिरोमणी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज यांच्या प्रेरणेने व प्रमुख उपस्थितीत अक्षय तृतीया निमित्त वार्षिक ओम जगदुरु जनशांती धर्मसोहळा दि २८ एप्रिल ते ५ मे२०२५ या कालावधीत श्री क्षेत्र वेरूळ तालुका रत्नापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे जय बाबाजी भक्त परिवारातर्फे आयोजित करण्यात आलेला, आहे महिला जप अखंड नंदादीप या सोहळ्यात जप अनुष्ठान. महिला जप. अखंड नंदादीप व यज्ञ या उपक्रमाचा सहभाग आहे

या सोहळ्यासाठी पूर्ण भारतातून अनेक मान्यवर साधु संत त्यामध्ये महानिर्वाणपिठाधीश्वर महानिर्वाण श्री श्री१००८ आचार्य श्री आचार्य स्वामी श्री स्वामी विश्वका नंद भारती जी महाराज हरिद्वार महंत श्री स्वामी नारायणगिरीजी महाराज प्रवक्ता पंचदशमान जुना आखाडा दिल्ली जगद्गुरु शंकराचार्य नरेंद्रनंद सरस्वती महाराज सुमेरूपीठ वाराणसी पूज्य महामंडलेश्वर आचार्य स्वामी श्री प्रणवानंद सरस्वती जी महाराज ( इंदूर वृंदावन ) पूज्य संत श्री गोपाल चैतन्य जी महाराज अध्यक्ष अखिल भारतीय संत समिती महाराष्ट्र श्री श्री१००८, महामंडलेश्वर शिव गिरीजी महाराज राष्ट्रीय अध्यक्ष त्र्यंबकेश्वर श्री श्री१००८ शंकरानंद सरस्वती महाराज श्री महंत गणेशायनंद सरस्वती महाराज पंचदश नाम जुना आखाडा महंत ठाणापती व समस्त साधू संन्याशी वृंद त्र्यंबकेश्वर श्री श्री१००८, महामंडलेश्वर येतेंद्रआनंद, महाराज रोडकी हरिद्वार सभापती , श्री महंत प्रेमगिरी जी महाराज पंच दशनाम जुना आखाडा तसेच महामंत्री अखिल भारतीय आखाडा परिषद व श्री महंत शंकरानंद सरस्वती जी अध्यक्ष श्री पंचायत आनंद आखाडा कोषाअध्यक्ष अखिल भारतीय आखाडा परिषद यांच्या उपस्थितीत होणार असून या सोहळ्याची ध्वजारोहण दि २०/५/२०२५ रोजी होणार असून या सोहळ्यासाठी आपण सहभागी होऊन श्री बाबाजींचा आशीर्वाद प्राप्त करून घ्यावा या सोहळ्याची माहिती जय बाबाजी भक्त परिवाराचे प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र जी पवार यांनी वेरूळ येथे पत्रकार परिषदेत दिली

यावेळी शिवा अंगुल गावकर संदीप मोडके राजेंद्र रंगनाथ चव्हाण कौरोजी निगोटे पुंजाराम गांगुर्डे केशव मामा कैलास लगड जनार्धन रिठे अरुण कोल्हार भगवान राऊत दत्तू निर्मल वैभव आगलावे लोमटे अण्णा सुरेश मगर ज्ञानेश्वर सोनवणे संजय घुमे बाबासाहेब पवार कचरू कदम रंगनाथ ठुबे यावेळी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची इयत्ता चौथीची विद्यार्थिनी कुमारी क्रांती निलेश गावडेचे वकृत्व स्पर्धेत यश



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ एप्रिल – सोयगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची इयत्ता चौथीची विद्यार्थिनी कुमारी क्रांती निलेश गावडे हिचा कै. शिवराम बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित साईराज इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय जेऊर तालुका कन्नड यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय शालेय वकृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आला. संस्थेचे अध्यक्ष संदीप पवार यांच्या हस्ते तिला रोख -११११११/- रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.स्पर्धेच्या तयारीसाठी तिला तिच्या वर्गशिक्षीका पी.एम.भिसे यांचे मार्गदर्शन लाभले.शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक पोत्रे सरांनी व सर्व शिक्षक वृंदांनी तिचे अभिनंदन केले.

## एमजीएममध्ये 'लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य' विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वीपणे संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.१५ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे कॉलेज ऑफ कॅम्युनिकेशन, कल्चर आणि मिडिया व डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीजच्या संयुक्त विद्यमाने 'लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य' या विषयावर एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. ही परिषद आर्यभट्ट सभागृह येथे पार पडली. या परिषदेचा उद्देश जागतिक पातळीवर विचारवंत, पत्रकार, अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना एकत्र आणून सध्याच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित करणे हा होता.

परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले आणि पत्रकार प्रसन्न जोशी हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख उपस्थित मान्यवरांमध्ये एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरु डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, अभ्यासक, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनपर सत्रामध्ये पत्रकार निरंजन टकले यांनी 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य व सध्याचे वास्तव' या विषयावर प्रभावी भाषण केले. त्यांनी पत्रकारितेतील स्वातंत्र्याच्या मर्यादा आणि भीतीमुक्त प्रसारमाध्यमांची गरज अधोरेखित केली. पत्रकार प्रसन्न जोशी यांनी 'लोकशाही आणि मीडिया हाऊसचे राजकीय प्रभाव' यावर भाष्य करताना माध्यममालकी, राजकीय दबाव आणि जनमत यामधील गुंतागुंतीचे नाते उलगडून सांगितले. यानंतर कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यापीठाच्या लोकशाही मूल्यांप्रती असलेल्या बांधिलकीवर प्रकाश टाकला.

'जागतिक पातळीवरील अभिव्यक्ती स्वातंत्र्य' या विषयावर पत्रकार प्रसन्न जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली परिसंवाद संपन्न झाला. यामध्ये जोशुआ किप्केमोई बोइत (केनिया), इम्रान मन्सूर अबू बक्र (येमेन), मिस कदीजातो जल्लो (गांबिया) यांनी त्यांच्या देशातील अनुभव शेअर करत युवा सहभाग आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

परिषदेच्या समारोप सत्रामध्ये ॲड. वैशाली डोळस 'भारतीय लोकशाहीतील स्त्रियांचे योगदान', डॉ. डॉरकस ओयेबिसी एत्तांग (द. आफ्रिका) यांनी 'कला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य : शांततेकडे जाणारा मार्ग' तर अधिष्ठाता गुरू पार्वती दत्ता यांनी 'कला म्हणजे अभिव्यक्ती : लोकशाहीमधील सांस्कृतिक अभिव्यक्तीचे स्थान' या विषयावर आपले विचार मांडले.परिषदेत उत्तम शोधनिबंध सादर करणाऱ्या संशोधकांना बेस्ट पेपर अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. रामेश्वर कणसे, प्रा.कविता सोनी, प्रा. रिहाना सय्यद व सर्व संबंधित मान्यवरांनी आपले योगदान दिले. या परिषदेत एकूण १३१ अभ्यासकांनी आपला सहभाग नोंदवला.

## विघ्नहर्ता गणेश मंदिराचा मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

### चार दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



तभावृत्तसेवा

गंगापूर दि.१५: गंगापूर शहरात नव्याने बांधण्यात आलेल्या श्री विघ्नहर्ता गणेश मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा १३ ते १६ एप्रिल २०२५ दरम्यान अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होत आहे. या चार दिवसांच्या कार्यक्रमात विविध धार्मिक विधी, कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात १३ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता गणपती पूजन, शोभायात्रा आणि आरतीने झाली. १४ एप्रिलला मूर्तीचा धान्याधिवास व प्राणप्रतिष्ठेची विशेष आरती पार पडली. १५ एप्रिलला पूजन, उत्तरांगस्नान व महाआरतीचे आयोजन केले आहे.मुख्य प्राणप्रतिष्ठा सोहळा १६ एप्रिल २०२५ (संकष्टी चतुर्थी) रोजी होणार असून, या दिवशी सायंकाळी ६:३० वाजता निमित्त ह.भ.प. महंत रामगिरी महाराज गोवर्धन (सरला बेट) यांचे जाहिर कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या संपूर्ण आयोजनात आमदार प्रशांत बंब यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. श्री विघ्नहर्ता गणेश मंदिर ट्रस्ट, गंगापुर यांच्यावतीने सर्व भाविकांना या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी नगरसेवक लक्ष्मणसिंग राजपूत प्रदीप पाटील अविनाशपाटील विजय पानकडे भाग्येश गंगवाल डॉक्टर आबासाहेब सिरसाठ श्रीराम नावंदर करण खोमणे करण राजपूत रमेश भुसारे नितीन मंदिराचे पुजारीउमेश गुरु जोशी विष्णुपंत दादा पोळ संजय रोकडे मदनसिंग

राजपूत सचिन भवार बारकू भाऊ राजपूत बाबूलाल राजपूत सुखलाल राजपूत केतन आरसूल गोकुळ राजपूत विघ्नहर्ता गणेश मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

INVITATION TO THE REMAINING PUBLIC SHAREHOLDERS TO AVAIL THE EXIT OPPORTUNITY UNDER EXIT OFFER

**TCI DEVELOPERS LIMITED**

**Corporate Identification Number (CIN):** L70102TG2008PLC059173
**Registered Office:** Flat No. 306-307, 1-8-271 to 273, 3rd Floor, Ashoka Bhoopal Chambers, S. P. Road, Secunderabad, Telangana, 500003 | **Tel. No.:** +91- 40-27840104 | **Fax. No.:** +91- 40-27840163
**Contact Person:** Mr. N. K. Baranwal, Director
**Email id:** secretarial@tcidevelopers.com | **Website:** www.tcidevelopers.com

**Dear Residual Public Shareholder,**

(This public invitation shall be read in continuation of and read in conjunction with and all capitalized terms used in this public invitation shall have the same meaning as ascribed to it in Detailed Public Announcement dated September 02, 2022 published on September 05, 2022 ("**DPA**"), the Letter of Offer dated September 05, 2022 ("**LOF**"), Post Offer PA dated September 21, 2022 ("**Post Offer PA**"), Exit Offer Public Announcement dated November 03, 2022 ("**Exit Offer PA**"), Exit Letter of Offer dated November 11, 2022 ("**ELOF**") and Corrigendum to the public announcement dated November 17, 2023 and May 31, 2024.

This invitation of the Company is being issued for and on behalf of TDL Real Estate Holdings Limited ("**Promoter Acquirer**"), and other members of promoter and promoter group of TCI Developers Limited to the remaining Public Shareholders ("**Residual Public Shareholders**") of TCI Developers Limited (the "**Company**") in adherence with Regulation 27(1)(a) and all other applicable regulations of the Delisting Regulations.

This is to inform to all Residual Public Shareholders that the Equity Shares of the Company have been delisted and trading in the Equity Shares of the Company has been discontinued trading w.e.f. November 11, 2022 ("**BSE and NSE Date of Discontinuance of Trading**") and the above referred security symbol will be delisted from BSE and NSE with effect from November 18, 2022 ("**BSE and NSE Date of Delisting**").

In terms of Regulation 27(1)(a) read with Regulation 26 and all other applicable Regulations of the Delisting Regulations, the Promoter Acquirer is inviting the Remaining Public Shareholders to avail the exit opportunity during the one-year exit window after delisting of Equity Shares.

The Residual Public Shareholders who have still not tendered their Equity Shares, can tender their Equity Shares to the Promoter Acquirer at the **Exit Price of Rs. 400/-** (Indian Rupees Four Hundred Only) during the extended period from **June 01, 2024 till May 31, 2025** (both days inclusive) (the **"Exit Window"**) subject to the terms and conditions provided in ELOF.

The Residual Public Shareholders are required to ensure that their Exit Application Form, together with the necessary enclosures, as per ELOF, is received by the Registrar to the **Exit Offer on or before May 31, 2025.**

In case of non-receipt of said Exit Application Form / ELOF or if the same has been misplaced, the Residual Public Shareholders may obtain a copy of the same by writing to the Registrar to the Exit Offer. Copy of the ELOF can also be downloaded from the websites of the BSE at www.bseindia.com, NSE at www.nseindia.com and Company at www.tcidevelopers.com.

**A follow-up email for the quarter ended March 2025,** has been sent to all the remaining Residual Public Shareholders in compliance with Regulation 27(1)(b) of the Delisting Regulations.

The Promoter Acquirer will make the payment by way of electronic credit to Residual Public Shareholders who have validly tendered their Equity Shares in Exit Offer following the receipt and verification of duly filled Exit Applications Form(s) (together with necessary enclosures, if any and receipt of the Equity Share(s) in the Special Depository Account / receipt of physical share certificate(s) (along with duly filled in transfer deed(s) as applicable) by the Registrar to the Exit Offer.

Any Residual Public Shareholders seeking any other assistance in connection with their shareholding like issue of duplicate share certificate, rectification of name, transmission of shares, deletion of name of a shareholder in case of joint shareholding, etc. may contact the Registrar to the Exit Offer.

**The Promoter Acquirer accept full responsibility for the information contained in this Public Invitation and confirms that such information is true, fair and adequate in all material aspects.**

| MANAGER TO THE OFFER | REGISTRAR TO THE EXIT OFFER |
|---|---|
| SAFFRON energising ideas<br>**SAFFRON CAPITAL ADVISORS PRIVATE LIMITED**<br>605, 6th floor, Centre Point, Andheri Kurla Road, J.B. Nagar, Andheri (East) Mumbai - 400 059, Maharashtra, India.<br>**Telephone:** +91 22 4973 0394 \| **Fax:** NA<br>**E-mail:** delistings@saffronadvisor.com<br>**Website**: www.saffronadvisor.com<br>**Investor grievance:** investorgrievance@saffronadvisor.com<br>**SEBI Registration Number:** INM 000011211<br>**Validity of Registration:** Permanent<br>**Contact Person:** Amit Wagle/ Gaurav Khandelwal | KFINTECH<br>**KFIN TECHNOLOGIES LIMITED**<br>Selenium Tower – B, Plot 31 & 32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Serilingampally, Hyderabad 500 032, Telangana, India.<br>**Telephone:** +91 40 6716 2222/ / +91 40 7961 1000<br>**Toll Free No:** 1-800-3094-001 \| **Fax:** + 91 40-23001153<br>**Email:** tci.delistingoffer@kfintech.com<br>**Website:** www.kfintech.com<br>**Investor Grievance Email:** einward.ris@kfintech.com<br>**Contact Person:** Mr. Murali Krishna M<br>**SEBI Registration Number:** INR000000221 |

*For and on behalf of the Board of Directors of TDL Real Estate Holdings Limited (the Promoter Acquirer)*

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| Urmila Agarwal | Karanjit Singh | Ishwar Singh Sigar |

**Place:** Gurugram
**Date:** April 15, 2025
AdBaaz

## कार्यालय नगरपंचायत सोयगाव
## जि. छत्रपती संभाजीनगर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

### जाहीर निविदा सूचना

नगरपंचायत सोयगाव ला सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षा करिता नगरपंचायत सोयगाव च्या खालील विभागाकरिता कार्यालयीन कामाकरीता विविध साहित्य खरेदी व वाहन पुरवीने इत्यादी कामे करण्याकरिता दर निश्चित करावयाची आहे. तरी सक्षम पुरवठा धारक किंवा कंत्राटदारानी आपल्या दराची सिलबंद पाकिट निविदा प्रसिद्ध झाल्यापासुन दिनांक २२/०४/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत नगरपंचायतीच्या निविदा आवक जावक विभागामध्ये निविदा सादर कराव्यात.

निविदा फॉर्म नगर पंचायत कार्यालयात को-या निवीदा प्रपत्राची किंमत रोखपाल/संबंधीत लिपीक यांचे कडे रोखीने भरुन दिनांक १६ /०४/२०२५ पासुन दिनांक २२ /०४/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संबंधित विभागात मिळेल.

| अ. क्र. | करावयाचा कामाचा तपशिल | बयाना /अनामत रक्कम | को-या निवीदा फॉर्म प्रपत्राची किंमत |
|---|---|---|---|
| | **भांडार विभाग** | | |
| १ | कार्यालयीन स्टेशनरी व कार्यालयीन छपाई साहित्य खरेदी करणे. | रु. १०००/- | रु.२००/- |
| २ | विविध कार्यक्रमाकरिता मंडप शामियाना, लाउडस्पिकर खुच्या पुरविणे. | रु. १०००/- | रु.२००/- |
| ३ | नगरपंचायत कार्यालयाकरिता आवश्यक संगणक संच, प्रिंटर, संगणकीकृत यंत्रनेस लागणारे विविध साहित्याचा सुटे भाग इतर साहित्य तसेच विविध प्रिंटरचे कार्टेज रिफीलींग व संगणक दुरुस्ती वार्षिक दर कराराने पुरवठा करणे. | रु. ५००/- | रु.२००/- |
| ४ | नगरपंचायत मध्ये आवश्यक असेल तेव्हा फोटोग्राफर व व्हिडीयो शुटींग ची सेवा देणे. | रु. ५००/- | रु.२००/- |
| ५ | नगरपंचायत कार्यालयाकरिता फर्निचर पुरवठा करणे. | रु. १०००/- | रु.३००/- |
| ६ | नगरपंचायत कार्यालयाकरिता विद्युत साहित्य खरेदी करणे. | रु. ५००/- | रु.३००/- |
| ७ | नगरपंचायत कार्यालयाकरिता आवश्यक असेल तेव्हा फुलहार व पुष्प गुच्छ पुरविणे बाबत. | रु. ५००/- | रु.२००/- |
| ८ | नगरपंचायत कार्यालयाकरिता लोखंडी बोर्ड पुरविणे बाबत. | रु. ५००/- | रु.३००/- |
| ९ | नगरपंचायत कार्यालयातील कर्मचार्यांना गणवेश / साडी पुरविणे बाबत. | रु. ५००/- | रु.५००/- |
| १० | झेरॉक्स व प्रिंटरचे कार्टेज रिफीलींग करणे. | रु. ५००/- | रु.२००/- |
| ११ | स्वच्छ सर्वेक्षण व इतर उत्सवासाठी व वेळोवेळी शासनाने अंमलात आणलेल्या कार्यक्रमाचे डिजीटल बॅनर, होल्डींग, स्टीकरर्स चा पुरवठा करणे. | रु. ५००/- | रु.२००/- |
| | **स्वच्छता व पाणीपुरवठा विभाग** | | |
| १ | नाला सफाई व नाला खोदकामा करिता जे.सी.बी. मशीन प्रती तास दराने पुरवीने. | रु. ५००/- | रु.३००/- |
| २ | सार्वजनीक संडास व रस्ता नाली सफाई साठी सफाई कामाकरिता बुट,मास,अप्रेन,हात मोजे लागणा-या साहित्याचा पुरवठा करणे. | रु. ५००/- | रु.३००/- |
| ३ | नगरपंचायत कार्यालयाकरिता जंतु नाशक व तणनाशक औषधी पुरवीने बाबत. | रु.१०००/- | रु.३००/- |
| ४ | शहरात वेळोवेळी मैला उपसा करण्यासाठी व इतर कामासाठी वाहन (Desludging Vehicle )पुरवठा करणे बाबत. | रु.१०००/- | रु.३००/- |
| ५ | पाणीपुरवठा पाईप लाईन दुरुस्ती साहित्य. | रु.५००/- | रु.३००/- |
| ६ | पाणीपुरवठा साठी मनुष्यबळ पुरवठा करणे. | रु.५००/- | रु.३००/- |
| ७ | ब्लिचिंग पावडर व तुरटी पुरवठा करणे. | रु.२०००/- | रु.५००/- |
| ८ | सोयगाव नगरपंचायतीसाठी लेखा द्विनोंद पध्दती काम करणे बाबत. | रु.१०००/- | रु.५००/- |
| इतर | | | |
| १ | कार्यालयीन ईन्वर्टर खरेदी व दुरुस्ती करणे. | रु.१०००/- | रु.५००/- |
| २ | मासिक सभेसाठी मान्यवराच्या चहापान व अल्पोहार पुरवठा करणे बाबत. | रु. ५००/- | रु.२००/- |

अटी व शर्ती :-

१. को-या निवीदा फॉर्म संबंधित विभाग प्रमुखाकडे दिनांक १६/०४/२०२५ पासुन दिनांक २२/०४/२०२५ रोजीपर्यंत (सुटीचे दिवस वगळता) सकाळी ११.०० ते सायं.५.०० वाजेपर्यंत मिळतील.
२. निविदा नगरपंचायत आवक जावक लिपीक यांच्याकडे दिनांक १६/०४/२०२५ पासुन दिनांक २२/०४/२०२५ सायं.५.०० वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळता) स्विकृत केल्या जातील.
३. अनामत रक्कम नगदीने किंवा एफ.डी.आर.स्वरुपात मुख्याधिकारी न.प. सोयगाव यांचे नावे भरावी लागेल.
४. नगर पंचायत निधीच्या उपलब्धते नुसार देयक अदा करण्यात येतील.
५. साहित्य न.प. कार्यालयात अथवा आदेशात दर्शविल्या ठिकाणी स्वखर्चाने पोहचुन द्यावे लागेल.
६. वरिल प्रत्येक नमूद कामाची निविदा स्वतंत्र भरावी.
७. पुरवठा धारकाचे देयकातुन शासकिय कपाती करण्यात येतील.
८. निवीदा मंजुर झाल्यानंतर आवश्यक तेवढ्या रकमेचे मुद्रांक (स्टॅम पेपरवर) करारनामा करुन देणे बंधन कारक राहील.
९. निविदा ह्या नगर पंचायत ने पुरविलेल्या निविदे प्रपत्रावर भराव्या लागतील.
१०.सदरहु निविदेतील दर दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यत लागु राहतील.
११.निविदेच्या स्वरुपानुसार/प्रकारानुसार आवश्यक कागदपत्रे दुकान नोंदणी प्रमाणपत्र , उद्योग आधार ,शासकिय प्रमाणपत्रे (उदा.GST,आयकर भरणा प्रमाणपत्र,EPFइ.) निवीदेसोबत जोडणे आवश्यक राहील.
१२.इतर शर्ती व अटी तसेच साहित्य यादीचे विवरण कार्यालयीन वेळेत संबंधित विभागात पाहावयास मिळतील.
१३.कोणतेही एक किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

*स्वाक्षरीत/-*
**संभाजी देशमुख**
**प्र. मुख्याधिकारी**
**नगरपंचायत सोयगाव**

## अग्रलेख...

# बंगालचे गौडबंगाल!

ब्रिटिश राजवटीच्या विरोधातील रणशिंग फुंकून संपूर्ण देशाला स्वातंत्र्याच्या सूर्योदयाची दिशा दाखविणाऱ्या पश्चिम बंगालच्या राजकारणाने स्वातंत्र्यानंतर, विशेषतः, गेल्या सुमारे सहा दशकांत वेगळाच मार्ग निवडल्याचे इतिहासावरून दिसते. सन १९७१ मध्ये, म्हणजे इंदिरा गांधींनी देशावर आणिबाणी लादण्याच्या चार वर्षे अगोदर, काँग्रेसचे नेता सिद्धार्थ शंकर रे यांनी राष्ट्रीय राजकारणातून पुन्हा पश्चिम बंगालच्या राजकारणाकडे मोहरा वळविला आणि त्यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारच्या काळात या राज्यात राजकीय हत्याकांडांनी कळस गाठला. या इतिहासाने जुन्या इतिहासाचे सारे विक्रम तर मोडलेच, पण सत्ता आणि हिंसक संघर्ष यांनी हातात हात घालून चालावे अशा परंपरेचा नवा पायंडाही त्या काळात पडला. देशाच्या फाळणीनंतर पश्चिम बंगालचे राजकारण सातत्याने हिंसाचाराच्या आगीत धगधगत राहिलेच होते. १९७९ मधील सुंदरबनमधील बांगलादेशी हिंदू निर्वासितांचे हत्याकांड हा त्या इतिहासातील एक सर्वांत काळा अध्याय होता. साठच्या दशकात नक्षलबारीच्या हिंसक कारवायांनी या इतिहासाला हे वळण दिले. खरे तर तेव्हापासूनच, सत्तासंघर्षाच्या त्या इतिहासाने मागे वळून पाहिलेच नाही. आजच्या घडीला, तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांच्या सरकारच्या काळातील हिंसाचाराने तोच कित्ता वारंवार गिरविला आहे आणि प्रत्येक नव्या हिंसाचाराने अगोदरच्या घटनांना मागे टाकण्याचा जणू चंग बांधला केला आहे. मोदी सरकारने संसदेत मांडलेले वक्फ कायदा सुधारणा विधेयक बहुमताने संमत झाल्यानंतर ते कायद्याच्या रूपाने संपूर्ण देशात लागू होईल आणि त्याची अंमलबजावणी करणे सर्वांस बंधनकारक राहील अशी स्पष्टोक्ती गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेतच केलेली असतानाही, पश्चिम बंगालमध्ये या कायद्याची अंमलबजावणी करणार नाही असा थेट संघर्षाचा पवित्रा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी घेतला आहे. शिवाय, या कायद्यास आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणी व सर्वोच्च न्यायालयाची भूमिकाही अद्याप स्पष्ट झालेली नसताना कायदा झुगारून विरोधी आंदोलकांना एक प्रकारे नैतिक पाठबळ देऊन ममता बॅनर्जी यांनी राज्यातील कायदा सुव्यवस्था स्थिती चिघळविण्याच्या प्रयत्नांस खतपाणी घातले आहे.

संसदेत हे विधेयक मांडले गेले, तेव्हा लोकसभा आणि राज्यसभेतही चर्चेदरम्यान त्यास विरोध झाला. या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले तेव्हा त्याचा विरोध आणखी प्रखर झाला, पण त्याला केंद्राच्या विरोधापुरती का होईना, विरोधकांची पठडीबाज वैचारिक बैठक होती. विरोधाची हिंसक आग मात्र, ममता बॅनर्जी यांची सत्ता असलेल्या पश्चिम बंगालमध्ये भडकली. लोकशाहीमध्ये विरोधाचा अधिकार सर्वमान्य असतो. आंदोलनांचा अधिकारही स्वीकारला गेलेला आहे. पण न्यायालयाचा निर्णय येण्याआधीच कायदा हातात घेऊन वक्फ कायद्याची राज्यात अंमलबजावणीच न करण्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींच्या भूमिकेमुळे राज्यातील हिंसक विरोधास पाठबळ मिळाले आहे. खरे तर, कायद्याच्या विरोधातील आंदोलनाने असे बेकायदा संघर्षाचे रूप धारण करू नये यासाठी राज्यकर्त्यांकडून संयमाची आणि पुरेशा खबरदारीचीही अपेक्षा असते. ममता बॅनर्जी यांनी तशी खबरदारी घेतलेली दिसत नाहीच, पण संयम दाखविणे टाळून कायद्याच्या विरोधात संघर्षाची भूमिका घेतली आहे. मुर्शिदाबादेत वक्फ कायद्याच्या विरोधात सुरू झालेल्या हिंसाचाराने संयमाचे सारे बांध तोडले असून दंगलखोरांनी पाण्याच्या टाक्यांमध्ये विष मिसळल्याच्या भीतीने अनेक हिंदू कुटुंबांनी घरेदारे सोडून पलायन करण्यास सुरुवात केली आहे. तेथील स्थिती तणावपूर्ण आहे आणि दंगली आटोक्यात आणण्यासाठी सीमा सुरक्षा दलांच्या जवानांची कुमक आयात करावी लागली आहे. हजारो पोलिस कर्मचाऱ्यांनी डोळ्यात तेल घालून गस्त सुरू केली आहे आणि धार्मिक तणावामुळे परिस्थिती अधिकच चिघळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वक्फ कायदा सुधारणा विधेयक संसदेत मांडले जात असतानाच पश्चिम बंगालमध्ये त्याविरोधातील आंदोलनांची तयारी सुरू झाली होती आणि ८ एप्रिलला या आंदोलनाने हिंसक वळण घेतले. म्हणजे, जवळपास एक आठवड्यापासून हे राज्य हिंसाचाराने धगधगत आहे. वक्फ कायद्यास विरोध करण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या हिंसक दंगलखोरांनी तीन निष्पापांचा बळी घेतला आहे, पोलिसांवर हल्ले केले, सरकारी मामलत्तांची नासधूस केली आहे आणि कायदा सुव्यवस्था धाब्यावर बसविली आहे. असे अराजक राज्यात माजलेले असताना, संसदेने संमत केलेला कायदा राज्यात लागू केला जाणार नाही अशी आडमुठी भूमिका घेत विरोधी आंदोलनांची ताकद वाढविणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्या राजकारणाने हिंसाचाराच्या इतिहासाला अधिक प्रखरपणे वर्तमानाच्या टप्प्यावर आणून ठेवले आहे यात शंका नाही.

राज्याची कायदा सुव्यवस्था स्थिती कायम राखणे, सामाजिक सलोखा बिघडणार नाही याची काळजी घेणे ही राज्य सरकारची जबाबदारी असते. या कायद्याच्या विरोधातील लढाई आपण सर्वांनी मिळून लढायची आहे, अशी या टप्प्यावर ममता बॅनर्जी यांनी घेतलेली भूमिका आणि कोणत्याही स्थितीत कोलकात्याचा कारभार ठप्प करण्याची ममता सरकारमधील एका मंत्र्यानेच घेतलेली भूमिका म्हणजे जबाबदारी खुंटीवर ठेवून कायदा सुव्यवस्था स्थितीला वाऱ्यावर सोडण्यासारखेच आहे. संसदेने संमत केलेला कायदा राज्यात लागू केला जाणार नाही ही एका राज्याच्या मुख्यमंत्र्याची भूमिका केंद्रातील सरकारच्या विरोधाचा विखार किती खोलवर भिनला आहे याची प्रचीती देणारा आहे. या अराजकामागे आणखी एका घटनेचा संदर्भ असू शकतो का हेही या निमित्ताने तपासून पाहावयास हवे. कारण, कोणत्याही एखाद्या बाबीमुळे जेव्हा सरकारची जनमानसातील प्रतिमा संकटात येते, तेव्हा जनतेचे लक्ष अन्यत्र वळवून मूळ घटनेचा विसर पडावा असे काही राजकारण अनेकदा जन्माला घातले जाते. पश्चिम बंगालमधील स्कूल सेवा आयोगाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या शिक्षक भरतीमध्ये उमेदवारांकडून पैसै घेतले गेल्याच्या आरोपावर शिक्कामोर्तब करून सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सुमारे २६ हजार शिक्षकांची नियुक्ती रद्द करण्यावर शिक्कामोर्तब केले आहे. या घोटाळ्यामुळे राज्यात तीव्र सामाजिक अस्वस्थता पसरली आहे. वक्फ कायदा विरोधी आंदोलनामुळे या घोटाळ्याची चर्चा मागे पडेल असेही बोलले जात आहे. जवळपास २६ हजार शिक्षकांवर अचानक बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळल्यामुळे जनतेत असंतोष आहे. बेरोजगारीचा प्रश्न हा कोणत्याही अन्य समस्येहून अधिक चिंताजनक असतो. साहजिकच, त्यातून उमटणाऱ्या सामाजिक आक्रोशास तोंड देण्याची वेळ ममता सरकारवर आली असती, तर ते अधिक अडचणीचे ठरले असते. वक्फ कायदाविरोधी आंदोलनामुळे त्या संकटाचे सावट तात्पुरते टळेल हा राजकीय फायदा ममता सरकारला मिळू शकतो.

पश्चिम बंगालचे राजकारण सत्ता, हिंसक संघर्ष आणि धार्मिक वादाभोवती फिरत राहिले आहे. वक्फ कायदा विरोधी आंदोलनांतून पुन्हा एकदा धार्मिक ध्रुवीकरण साधून आगामी विधानसभेत मतपेढीचे राजकारण करण्याचा एक आयता मुद्दाही ममता बॅनर्जींना मिळाला असावा. ममता बॅनर्जी यांनी आपली आडमुठी भूमिका कायम ठेवली तर राज्याच्या सामाजिक स्वास्थ्याचा विचार करून व अशा हिंसक अनाचारामुळे होणाऱ्या अराजकात समाज होरपळणार नाही याची जाणीव ठेवून केंद्र सरकारने ठोस भूमिका घेतली पाहिजे. अन्यथा, कुरघोडीच्या व विरोधाच्या राजकारणात सामान्य जनता निष्कारण भरडली जाईल. ज्या सामाजिक हिताच्या जाणिवेने कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला व संसदेने त्यास संमती दिली, त्या जाणिवेलाच मूठमाती मिळणे क्लेशदायक आहे. केंद्र सरकारने पश्चिम बंगालातील आंदोलनाचे गौडबंगाल उघड करून त्यावर योग्य तो इलाज करायलाच हवा. कारण, केवळ केंद्र सरकारला विरोध करायचा म्हणून जनतेच्या भावनांना वेठीस धरण्याचे राजकारण केवळ एखाद्या राज्याच्या नव्हे, तर संपूर्ण देशाच्या सामाजिक स्वास्थ्याकरिता आव्हान ठरू शकते.


## आंतरराष्ट्रीय

# व्यापारयुद्ध आणि चीन, युरोपवरील परिणाम

प्रा. जयसिंग यादव

'जोखीम कमी करा, वैविध्य आणा आणि व्यवसाय धोरण बदला' हा एके काळी जागतिक व्यापारावरील चीनच्या वाढत्या वर्चस्वाचा मुकाबला करण्यासाठी वापरला जाणारा मंत्र होता. तो आता अमेरिकेला लागू केला जात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्क लादून ऑस्ट्रेलियापासून ब्राझीलपर्यंतच्या वित्तीय बाजारात खळबळ उडवून दिली. त्यांनी चिनी बनावटीच्या वस्तूंवरील शुल्क १२५ टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. व्हाईट हाऊसने स्पष्ट केले की चिनी उत्पादकांना अमेरिकेत आयातीवर एकूण १४५ टक्के शुल्क भरावे लागेल. कारण नवीन १२५ टक्के शुल्क वर्षाच्या सुरुवातीला लादलेल्या २० टक्क्यांव्यतिरिक्त आहे. बऱ्याच चिनी वस्तू, खास करून अमेरिकी बाजारपेठेसाठी बनवल्या जात असल्याने, चीनला ती उत्पादने देशांतर्गत ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यात अडचणी येतील, अशी चिंता अर्थतज्ज्ञांना वाटते. अशा परिस्थितीमध्ये चीन आपल्या निर्यात धोरणाचा पुनर्विचार करीत आहे; जेणेकरून तो अमेरिकेत कमी झालेल्या निर्यातीचा धक्का दूर करण्यासाठी इतर जागतिक भागीदारांना प्राधान्य देऊ शकेल. लंडन येथील 'एनोडो इकॉनॉमिक्स'च्या संस्थापक आणि मुख्य अर्थशास्त्रज्ञ डायना चोयलेवा यांच्या मते चीन आपल्या प्रादेशिक शेजाऱ्यांना निर्यात वाढवण्याचा प्रयत्न करेल. त्यापैकी काही जणांशी त्याचे ऐतिहासिकदृष्ट्या तणावपूर्ण संबंध आहेत. चीन जुन्या शत्रूंसोबत संबंध सुधारण्याचा प्रयत्न करत आहे. सहा वर्षांमध्ये प्रथमच जपान आणि दक्षिण कोरियाशी चीनचा आर्थिक संवाद नुकताच पुन्हा सुरू झाला आहे. हे सूचित करते की, या प्रदेशातील प्रमुख शक्ती अमेरिकेच्या अनिश्चिततेला प्रतिसाद म्हणून त्यांच्या संबंधांचा पुनर्विचार करत आहेत.

दक्षिण कोरियाने अमेरिकेच्या शुल्कवाढीला 'संयुक्त प्रतिसाद' देण्याचा चिनी सरकारी माध्यमांचा दावा नाकारला असला, तरी अनेक वर्षांच्या तणावपूर्ण संबंधांनंतर केवळ त्रिपक्षीय आर्थिक सहकार्य पुन्हा सुरू करणे हे धोरणात्मक बदलाचे संकेत देते. गेल्या दोन दशकांमध्ये चीन आणि आग्नेय आशियाने त्यांचे व्यापारी संबंध लक्षणीयरीत्या मजबूत केले आहेत. चीन सरकारच्या आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये चीन आणि 'एशियन' देशांमधील एकूण व्यापार सुमारे ८७२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला आहे. चिनी कंपन्यांची अमेरिकेला होणारी निर्यात बंद झाल्यामुळे हा आकडा आणखी वाढणार आहे. चिनी उत्पादक आग्नेय आशियामध्ये अशा संधी शोधतील, ज्यात त्यांनी पूर्वी जास्त वेळ, मेहनत आणि पैसा गुंतवला नाही. कारण त्यांच्याकडे एक किफायतशीर अमेरिकी बाजारपेठ होती, जी त्यांची सर्व उत्पादने वापरत असे. अमेरिकेने पुकारलेल्या व्यापारयुद्धाला युरोपनेही त्याच भाषेत उत्तर दिले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्कवाढीला नव्वद दिवसांची स्थगिती दिल्याने युरोपीय महासंघानेही नव्याने लादलेल्या



शुल्काला नव्वद दिवसांची स्थगिती दिली. याचा अर्थ अमेरिका आणि युरोप सध्या तरी जशास तसे उत्तर देण्याच्या मन:स्थितीत आहेत. 'टॅरिफ वॉर'मुळे अमेरिकेने जगातील अनेक मित्र गमावले आहेत, असा त्याचा अर्थ आहे. युरोपलाही आपल्या व्यापारात विविधता आणण्याची गरज आहे. अमेरिकेने लादलेले नवीन परस्पर शुल्क ९० दिवसांसाठी रोखून ठेवले असले तरी ४१६ अब्ज किमतीच्या युरोपीय महासंघामधील निर्यातीवर अमेरिका अजूनही २० टक्के शुल्क भरत आहे.

अमेरिकी संरक्षणवादाचा मुकाबला करण्यासाठी युरोपीय महासंघ 'इंडो-पॅसिफिक' आणि 'ग्लोबल साऊथ'मधील देशांपर्यंत पोहोचण्याची योजना आखत आहे. या आठवड्यात व्हिएतनामच्या तीन दिवसांच्या भेटीदरम्यान स्पॅनिश पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी युरोपला नवी बाजारपेठ शोधण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, त्यांचे सरकार युरोपला आग्नेय आशियाशी अधिक व्यापारासाठी खुले करण्यासाठी वचनबद्ध आहे. तथापि, 'युरोपियन पॉलिसी सेंटर' (ईपीसी) मधील धोरण विश्लेषक वर्ग फोकमन यांनी इशारा दिला की युरोपला इतर बाजारपेठांमधून ट्रान्स ॲटलांटिक निर्यातीची भरपाई करणे कठीण जाईल. कारण अमेरिकेची अर्थव्यवस्था मोठी आणि श्रीमंत आहे. नवीन व्यापार सौद्यांना युरोपीय महासंघाच्या सदस्यांमध्ये खूप विरोध केला. यामध्ये त्यांनी दक्षिण अमेरिकन प्रादेशिक ब्लॉक मर्कोसूर सोबत युरोपीय महासंघाच्या व्यापार कराराच्या वेळी ब्राझील आणि अर्जेंटिनासाठी कृषी क्षेत्र उघडण्याच्या फ्रान्सच्या सावधगिरीवर भर दिला. या कराराच्या वाटाघाटी करण्यासाठी २५ वर्षे लागली आणि अद्याप त्याला मान्यता मिळणे बाकी आहे. आज गरज असूनही नवीन सौद्यांची अंमलबजावणी करणे कदाचित खूप कठीण जाईल. वॉशिंग्टनस्थीत 'सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक ॲण्ड इंटरनॅशनल स्टडीज' (सीएसआयएस) या थिंक टॅंकने प्रकाशित केलेल्या एका टिप्पणीत म्हटले आहे की, अमेरिकेने चीनवर लादलेल्या टॅरिफमुळे चीन आता युरोपीय महासंघाला आपला माल पाठवण्यास सुरुवात करेल. यामुळे युरोपियन उत्पादकांवर आणखी दबाव येईल. यातून व्यापार वाचवण्यासाठी संरक्षणवादी उपायांची मागणी होऊ शकते.

युरोपीय महासंघाला बऱ्याच काळापासून चिंता आहे की, चीनचे सरकार त्यांच्या उत्पादकांना मोठ्या प्रमाणात अनुदान देते. यामुळे ते युरोपियन बाजारपेठेत अत्यंत स्वस्त किमतीत वस्तू विकतात. म्हणजेच ते युरोपियन बाजारपेठेत स्वस्त माल डम्प करू शकतात. स्वस्तात उपलब्ध असलेले मनुष्यबळ आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासह या अनुदानांमुळे युरोपीय कंपन्यांवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. यामुळे अनेक कंपन्या बंद पडू शकतात. अनेकांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. सरकारी सबसिडी, टॅक्स ब्रेक आणि स्वस्त कर्जांमुळे 'बीवायडी', 'निओ'सारखे चिनी ब्रॅण्ड आता युरोपियन बाजारपेठेत आक्रमकपणे प्रवेश करत आहेत आणि तिथल्या स्पर्धकांना मागे टाकत आहेत. युरोपमधील ऑटोमोबाईल उद्योग सध्या मोठ्या बदलाच्या काळातून जात आहे. यामुळे अनेक कारखाने बंद होण्याचा धोका आहे. काही कारखाने लहान होत आहेत आणि हजारो लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत.

युरोपियन औद्योगिक धोरणाचे अभ्यासक फोकमन यांना शंका आहे की युरोपियन महासंघ निषेध न करता व्यापार विकृती स्वीकारेल. युरोपीय महासंघाने सूचित केले आहे की, ते आयातीवर बारीक लक्ष ठेवतील. चीन किंवा इतर ठिकाणाहून आयातीमध्ये तीव्र वाढ झाली, तर त्यावर ते अंकुश आणतील. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी युरोपीय महासंघ मध्य आशियाकडे नजर ठेवून आहे. २०२३ मध्ये युरोपीय महासंघाने कोणत्याही कमोडिटीची आयात अचानक खूप वाढल्यास युरोपियन उद्योगाला धोका आहे का हे तपासण्यावर पाळत ठेवण्यासाठी कार्य दल तयार करण्याची योजना जाहीर केली.

ही प्रारंभिक प्रणाली चीनशी संबंधित जोखीम कमी करण्यासाठी तयार करण्यात आली होती. ही 'टास्क फोर्स' युरोपीय महासंघाला जलद पावले उचलण्यास मदत करू शकते. उदाहरणार्थ, स्वस्त वस्तूंची तपासणी (ॲण्टी-डम्पिंग तपासणी), अतिरिक्त शुल्क लादणे किंवा काही काळ आयातीवर बंदी घालणे. तथापि, ट्रम्प यांच्याप्रमाणे संरक्षणवादी धोरणांचा अवलंब केल्यामुळे युरोपीय महासंघाला टीकेला सामोरे जावे लागू शकते. असे वागणे युरोपीय महासंघाच्या दीर्घकाळ चाललेल्या मुक्त व्यापार तत्त्वज्ञानातून बाहेर पडण्यासारखे असेल. त्यामुळे जागतिक व्यापार संघटनेचे नियम कमकुवत होऊ शकतात आणि जगभरातील व्यापार तणाव वाढू शकतो.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# असोसिएटेडचे भूत पुन्हा मानगुटीवर

काँग्रेसची पनोती जणू काही पाचवीला पुजली असावी. ती अजूनही संपण्याचे नाव घेत नाही. काँग्रेसच्या कार्यकाळामध्ये अनेक घोटाळे गाजले. राजीव गांधी पंतप्रधान असताना तर बोफोर्स तोफांचा घोटाळा देशातच नव्हे तर जगभर गाजला. असंच एक प्रकरण 'असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड' या काँग्रेसच्या एका कंपनीचे. हेही प्रकरण त्याच मालिकेतले. सध्या हा घोटाळा देशभर गाजत आहे. त्यामुळे सोनिया गांधी आणि राहुल गांधी पुन्हा एकदा चर्चेमध्ये आले असून, अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने पाठविलेल्या नोटीसमुळे देशभरात उत्सुकता वाढली आहे. काँग्रेस पक्षाच्या नियंत्रणामध्ये असलेल्या असोसिएटेड जर्नल्स लि. म्हणजे एजेएलच्या ६६१ कोटींच्या मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी ईडीने नोटीस बजावली आहे.

एजेएलची स्थापना १९३७ मध्ये करण्यात आली. तेव्हा या कंपनीच्या भागधारकांची संख्या जवळपास एक हजार एवढी होती. त्यापैकी बहुतांश भागधारक हे काँग्रेस पक्षाचे सदस्यच होते, हे विशेष. त्यानंतर एका वर्षाने १९३८ मध्ये पं. जवाहरलाल नेहरू असताना 'नॅशनल हेरॉल्ड' हे वृत्तपत्र सुरू झाले. परंतु, २००८ मध्ये यूपीएची सत्ता केंद्रामध्ये असताना नॅशनल हेरॉल्डने प्रथम ९० कोटी रुपयांच्या नुकसानीची नोंद केली. यावेळी काँग्रेस पक्षाने उपरोक्त कंपनीला ९० कोटी रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी या बाबीस विरोध



झाला. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार कोणत्याही राजकीय पक्षाला कोणालाही कर्ज देण्याचा अधिकार नाही. मात्र, काँग्रेस पक्षाने सर्व संकेत पायदळी तुडवून कायद्याचे उल्लंघन केले. त्यानंतर दोन वर्षांनी २०१० साली 'यंग इंडियन लिमिटेड' या नावाची एक नवीन कंपनी तयार करण्यात आली. या कंपनीच्या भागधारकांमध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मोतीलाल व्होरा यांचा समावेश होता. सोनिया गांधी आणि राहुल गांधी या दोघांकडे या कंपनीचे ७६ टक्के शेअर्स होते. तर उर्वरित शेअर्स मोतीलाल व्होरा यांच्याकडे होते. त्यानंतर 'यंग इंडियन लिमिटेड'ने अधिक पैसे उभे करण्यासाठी एक फर्म स्थापन केली. त्याची नोंदणी कोलकाता येथे करण्यात आली. त्यानंतर या फर्मने ५० लाख रुपये उभे केले. त्यानंतर ही रक्कम एजेएलला देण्यात आली आणि त्याचे सर्व शेअर्स 'यंग इंडिया लिमिटेड'ला हस्तांतरित करण्यात आले.

दरम्यान काँग्रेस पक्षाने एजेएलला दिलेले ९० कोटी रुपयांचे कर्जही माफ केले. या कंपनी हस्तांतरणाच्या व्यवहारामध्ये 'मनी लॉण्ड्रिंग' झाल्याचा ईडीचा आरोप असून, या प्रकरणामध्ये मागे सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची ईडीने चौकशीही केली होती. सन २०१२ मध्ये सुब्रमण्यम स्वामी यांनी या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयामध्ये खटलाही दाखल केला होता. स्वामी यांनी दाखल केलेल्या दाव्यामध्ये काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी कोट्यवधी रुपयांची मालमत्ता बळकावल्याचा आरोप केला आहे. भारतामध्ये असोसिएट जर्नल्सजी करोडो रुपयांची संपत्ती असून, राजधानी दिल्लीमध्ये हेरॉल्ड हाऊस, मुंबईतील वांद्रे परिसरत इमारत व लखनौमध्येही या कंपनीची मालमत्ता आहे. काँग्रेस पक्षाचा इतिहास बघता उपरोक्त कंपनीच्या हस्तांतरणामध्ये घोटाळे झालेच नसतील, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरेल. केंद्रामध्ये भाजपाचे सरकार असल्यामुळे आपल्या सवयीनुसार काँग्रेस पक्ष भाजपावर खापर फोडून सामान्य जनतेमध्ये भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न निश्चितच करेल. परंतु, वारंवार खोटं कितीही रेटून बोललं तरीही ते सत्य कधीच होत नाही. या देशावर जवळपास ६० वर्षे राज्य करूनही काँग्रेसची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. जग बदलत असले तरी काँग्रेस अजूनही बदलायला तयार नाही. विरोधकांना निव्वळ शिव्या देऊन सत्ता हस्तगत करण्याचे दिवस लयाला गेलेत. आपल्या कर्तृत्वाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेच्या मनामध्ये एक विशिष्ट स्थान निर्माण केले आहे. उपरोक्त प्रकरणामध्ये पुन्हा एकदा त्यामध्ये नरेंद्र मोदी यांना ओढून काँग्रेस पक्ष आपला जुना राग आलापणार आहे, हे निश्चित. परंतु, जनतेलाही सर्व काही कळून चुकले आहे. त्यामुळे काँग्रेसचा सर्व आटापिटा याहीवेळी वाया जाणार आहे.

९८८१७१७८५६

# मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

**तृतिय सरसंघचालक प.पू.श्री.मधुकर दत्तात्रेय देवरस तथा बाळासाहेब देवरस सन १९४३ मधील प्रसंग. पुण्याच्या संघ शिक्षा वर्गात बाळासाहेबांचा परिचय करून देताना श्री.गोळवलकर गुरुजींनी स्वयंसेवकांना उद्देशून म्हटले, तुमच्यापैकी अनेक स्वयंसेवक असे असतील, की ज्यांनी डॉक्टरांना पाहिले नसेल. त्यांनी बाळासाहेबांकडे पहावं. डॉक्टर कसे होते हे त्यांच्याकडे पाहिल्यावर कळेल. अशीच एक दुसरी सन १९४५ मधील घटना आहे, नागपूर येथील रेशीमबाग संघस्थानावर एका उत्सवासाठी गाळवळकर गुरुजी टांग्यातून चालले होते. तीन - चार स्वयंसेवकांबरोबर बाळासाहेब त्या कार्यक्रमासाठी पायी जात असलेले गुरुजींना रस्त्यात दिसले. टांग्यात आपल्या शेजारी बसलेल्या कृष्णराव मोहरीर यांना गुरुजी म्हणाले, खरे सरसंघचालक तर पायी चालले आहेत आणि नकली सरसंघचालक टांग्यातून. या दोन प्रसंगांचा विचार करता बाळासाहेब देवरस यांची संघ कामातील सुरुवातीपासूनची समर्पण वृत्ती लक्षात येते व यातूनच संघाला तृतिय सरसंघचालक मिळाले.**

११ डिसेंबर रोजी नागपूर येथे बाळासाहेबांचा जन्म झाला. बाळासाहेबांचे वडील महसूल खात्यात शासकीय अधिकारी होते, त्यामुळे वेगवेगळ्या गावांमध्ये बाळासाहेबांना वडिलांबरोबर जावे लागले. बाळासाहेबांची आई धर्मपरायण होती, त्यामुळे सर्व मुलांवर उत्तम धार्मिक संस्कार झाले. पाच भाऊ व चार बहिणी अशा नऊ भावंडांमध्ये बाळासाहेब यांचा चौथा क्रमांक होता. त्यांच्या पाठीवरचा भाऊ म्हणजेच भाऊराव देवरास यांनी देखील संघ कामांमध्ये अनेक मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. एकाच कुटुंबातील दोन भावांनी संघ काम ासाठी आपले अवघे आयुष्य दिले आहे. नागपूर या ठिकाणी डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ मध्ये संघाची स्थापना केली, त्याच वर्षी या दोन भावंडांची मुंज झाली होती. एक प्रकारे नव्या गोष्टी शिकण्यासाठी ही दोन भावंडे तयार झाली होती व त्यांनी शाळेबरोबरच संघाच्या शाखेवरही प्रवेश केलेला होता.

संघाच्या कामामध्ये बाळासाहेब अगदी बाल असल्यापासून दाखल झाले व लवकरच या कामात रमले. डॉ.हेडगेवार यांचा ज्या स्वयंसेवकांना सहवास लाभला, यापैकी एक असणाऱ्या बाळासाहेबांनी डॉ. हेडगेवार यांच्याकडून अनेक गोष्टी शिकून घेतल्या. संस्कृत आणि दर्शनशास्त्र हे विषय घेऊन बाळासाहेब बी.ए. झाले, त्याच वर्षी त्यांनी लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. संघाच्या कामांमध्ये अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. नागपूर येथील इतवारी शाखेचे काम सर्वात मागे होते, नेमकी याच शाखेची जबाबदारी बाळासाहेबांनी घेतली व आपल्या कुशल नेतृत्वाने त्यांनी इतवारी शाखेच्या कामाला गती दिली. थोड्याच कालावधीमध्ये नागपूरमधील इतवारी शाखेचे काम सर्वात चांगले ठरले. इतवारी हा भाग त्यावेळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता, त्यामुळेच बाळासाहेबांनी या शाखेचा उत्तम विस्तार केला. अनेक नवनवीन उपक्रम - कार्यक्रम या शाखेमध्ये त्यांनी घेतले. पुढच्या काळामध्ये संघाच्या अनेक जबाबदाऱ्या त्यांच्याकडे चालून आल्या व या सर्व जबाबदाऱ्या बाळासाहेबांनी अत्यंत समर्पण भावनेने व प्रामाणिकपणाने पार पाडल्या.

डॉ.हेडगेवार यांच्याबरोबरच द्वितीय सरसंघचालक श्री.गोळवळकर गुरुजी यांचा बाळासाहेबांना दीर्घ असा सहवास लाभला. गुरुजी सरसंघचालक असताना बाळासाहेबांकडे अखिल भारतीय स्तरावरील अनेक जबाबदाऱ्या आल्या. ते सरकार्यवाह म्हणून देखील कार्यरत राहिले. प्रथमपासूनच बाळासाहेबांकडे भावी सरसंघचालक म्हणून गुरुजी पहात होते व आपला शेवटचा श्वास घेत असताना ५ जून १९७३ मध्ये गुरुजींनी बाळासाहेबांना सरसंघचालक म्हणून नियुक्त केले. सरसंघचालक ही जबाबदारी आल्यानंतर बाळासाहेबांना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. विशेषत: त्यानंतर लगेचच आलेल्या आणीबाणीमध्ये संघ व बाळासाहेब यांना मोठा त्रास सहन करावा लागला. आणीबाणीमध्ये ओघानेच संघावर देखील बंदी लादण्यात आली. संघाच्या हजारो - लाखो स्वयंसेवकांनी आणीबाणीच्या विरोधात संघर्ष केला, अशा स्वयंसेवकांना तुरुंगाम ध्ये टाकण्यात आले. बाळासाहेबांना देखील अटक करण्यात आली व पुण्याच्या येरवडा येथील कारागृहात ठेवण्यात आले. संघावर आलेली बंदी व झालेला कारावास या गोष्टीमुळे बाळासाहेब थोडे देखील डगमगले नाहीत. उलट त्यांनी संघ स्वयंसेवक व त्यांच्या कुटुंबीयांचे पालकत्व स्वतः कडे घेऊन सर्वांना आधार देण्याचे काम केले. आणीबाणी संपल्यानंतर विसरून जा, माफ करा असा स्वयंसेवकांना संदेश देऊन कोणताही संघर्ष होऊ दिला नाही.

हिंदुत्व व हिंदुत्ववादी संघटनांच्याविरुद्ध या कालखंडात मोठे वातावरण तयार करण्यात आले, सरकार पुरस्कृत काही गोष्टीही करण्यात आल्या. पंजाब मधील खलिस्तानी चळवळही याच कालखंडात निर्माण झाली. साहजिकच हिंदू सम ाजाचे संघटन करणे ही गोष्ट अशक्यप्राय झालेली होती. संघ व हिंदुत्वाचा विचार हा अवहेलनेचा - चेष्टेचा विषय झालेला होता. अल्पसंख्यांकांच्या नावाखाली एका विशिष्ट समुदायाचे लांगुलचालन करण्यासाठी सरकार व काँग्रेस अनेक हिंदू विरोधी गोष्टी करत होते, सरकारला जाब विचारणारी विरोधी पक्षांची सक्षमता देखील नव्हती. अशा कालखंडामध्ये हिंदुत्वाचा विचार जिवंत ठेवण्यासाठी बाळासाहेबांनी स्वयंसेवकांना सातत्याने मार्गदर्शन केले, प्रेरणा दिली व स्वतः अखंडपणे प्रवास करून संघाचे काम सर्वव्यापी व सर्वस्पर्शी बनविण्याचा प्रयत्न केला. याच कालखंडामध्ये सन १९८९ साली डॉ.हेडगेवार यांची जन्मशताब्दी आली. या निमित्ताने सेवा विषयामध्ये संघाने विशेष लक्ष घातले. बाळासाहेबांच्या दूरदृष्टीतून व मार्गदर्शनातून हजारो सेवा प्रकल्प उभारले गेले व या प्रकल्पातून समाजाला मोठी मदत लाभली.

एकीकडे एका विशिष्ट समुदायाचे लांगुलचालन होत असतानाच दुसरीकडे अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमीच्या संदर्भाने सरकार सातत्याने आडकाठी निर्माण करत होती, अशा परिस्थितीमध्ये राम जन्मभूमीच्या मुक्ती आंदोलनाला योग्य मार्गदर्शन करण्याचे व दिशा देण्याचे काम बाळासाहेबांनी केले. अनेक नव्या क्षेत्रामध्ये स्वयंसेवकांना पाठवून कामाला सुरुवात केली. अस्पृश्यता ही गोष्ट वाईट नसेल तर जगात कोणतीच गोष्ट वाईट नाही असा विचार पुण्यातील वसंत व्याख्यानमालेत मांडून बाळासाहेबांनी अस्पृश्यतेचा स्पष्ट शब्दात धिक्कार केला. बाळासाहेबांच्याच कालखंडामध्ये समरसता या नव्या विषयाला सुरुवात झाली. हिंदू समाजाचे संघटन करत असताना अस्पृश्यता, भेदाभेद व जातीयता या गोष्टींना कोणताच थारा असू शकत नाही ही गोष्ट बाळासाहेबांनी वारंवार मांडली व स्वयंसेवकांना समरसता निर्माण करण्यासाठी प्रवृत्त केले. संघाचे काम वेगवेगळ्या ज्ञाती व जात प्रवर्गामध्ये पोहोचविण्याचे काम बाळासाहेबांनी केले. वेगवेगळ्या प्रकारच्या आंदोलनाला दिशा देण्याचे काम बाळासाहेबांनी केले. डॉ.हेडगेवार व श्री.गोळवळकर गुरुजी यांनी पुढील सरसंघचालक कोण होणार याचे इच्छापत्र लिहून ठेवले होते व या दोघांच्या देहावसनानंतर संघाला या इच्छापत्रानुसार नवीन सरसंघचालक मिळाले. परंतु अत्यंत निस्वार्थ - निरपेक्ष भावनेने आयुष्य संघासाठी अर्पण केलेल्या बाळासाहेबांना आपल्या शारीरिक दुर्बलतेची जाणीव होताच नवीन सरसंघचालक नेमण्याची पूर्वपरंपरा त्यांनी बाजूला ठेवून ११ मार्च १९९४ मध्ये श्री.राजेन्द्रसिंह बलवंतसिंह ठाकूर यांच्याकडे चतुर्थ सरसंघचालकपदाची जबाबदारी सोपविली व स्वतः निवृत्ती स्वीकारली. आपले सारे आयुष्यच देश व संघ कार्यासाठी वाहणाऱ्या बाळासाहेबांना पद - प्रतिष्ठेचा मोह नव्हता, त्यामुळेच मी आता दुर्बल झालो आहे, माझ्याकडून आता काम होत नाही हे लक्षात घेऊन त्यांनी सरसंघचालक पदाचा त्याग केला व अखेरच्या श्वासापर्यंत ते मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहिले. १७ जून १९९६ मध्ये पुणे या ठिकाणी त्यांचे देहावसन झाले. विशेष गोष्ट म्हणजे ते अत्यंत आजारी असल्याच्या क्षणीच भारताच्या पंतप्रधानपदावर अटलबिहारी वाजपेयी सारख्या एका स्वयंसेवकाने शपथ घेतली, दूरदर्शनवरून हा सोहळा बाळासाहेबांनी पाहिला. एक संघ स्वयंसेवक, एक प्रचारक भारताच्या सर्वोच्च पदावर विराजमान झाला याचा बाळासाहेबांना खूपच आनंद झाला होता. असे हजारो - लाखो स्वयंसेवक बाळासाहेबांनी निर्माण केले, ज्या स्वयंसेवकांनी समाजाची व देशाची सेवा केली. बाळासाहेबांनी आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत असे स्वयंसेवक निर्माण केले, ज्या स्वयंसेवकांच्या कार्यातून आजचा आधुनिक भारत घडतो आहे. बाळासाहेबांनी एक संत वृत्तीचे जीवन जगून या देशातील लाखो - कोट्यावधी स्वयंसेवकांना, हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना कायम प्रेरणा देण्याचे काम केले व आजही करत आहेत.

**- डॉ.सचिन लादे, पंढरपूर**

## अति झालं अन् हसू आलं

एखाद्या राजकीय, सामाजिक धोरणावर प्रतिक्रिया देताना, त्या धोरणाचे कारण, त्याचे फायदे-नुकसान, सामाजिक आणि आर्थिक परिणाम पावर सखोल अभ्यास असणे आवश्यक आहे. पण काही राजकीय मंडळी, पक्षाचे प्रवक्ते माईकवा दांडा समोर आला की त्यांना कोणत्याही विषयावर प्रतिक्रिया दिल्याशिवाय राहवत नाही. एक मात्र खरे की यामुळे ही मंडळी सातत्याने प्रसिद्धी माध्यमाच्या झोतात राहतात. बरे एकतर या सगळ्या मंडळींचा प्रतिक्रिया देताना आविर्भाव असा असो असतो की त्या विषयावरील सर्वज्ञ त्यांनाच आहे. हीच बाब विरोधी पक्षातील प्रामुख्याने उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राउत, आदित्य ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, रोहित पवार, काँग्रेस पक्षाचे विजय वडेटीवार यांच्या बाबतीत झाली आहे. ही मंडळी दररोज ऊठसूठ कोणत्याही विषयावर मराठी वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींनी काहीही विचारले की, आपली प्रतिक्रिया देताना दिसतात. या प्रतिक्रिया देण्याच्या धुंदीत या मंडळींना आपण ज्या पक्षाचे नेतृत्व करतो त्या पक्षाचे किती मोठे नुकसान करत असतो, याची पुसटशी कल्पना नसते, पण एक मात्र खरे की, पांचा मात्र प्रसिद्धी माध्यमांत राहण्याचा अट्टहास पूर्ण होतो.

**- अविनाश देशपांडे/९२८४६७९६२३**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)



श्री.खंडेश्वरी देवी संस्थान बीड चैत्र पौर्णिमा महापुजा, द्राक्षाची आरास. करण्यात आली (छाया कृष्णा शिंदे)

## वायभटवाडीतील हनुमान मंदिर संस्थानची सर्वत्र किर्ती आणि ख्याती - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ एप्रिल**

वायभटवाडी येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर अतिशय नावारूपाला आलेले संस्थान असून या संस्थानची ख्याती आणि महिमा मोठा असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

बीड तालुक्यातील वायभटवाडी येथे वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून या सप्ताहाला माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट दिली. यावेळी ह.भ.प. महादेव महाराज माने, विलास बडगे, अरूण डाके, सखाराम मस्के, हर्षद क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, वायभटवाडी येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर संस्थान अतिशय नावारूपाला आलेले असून संस्थानची ख्याती आणि महिमा मोठी आहे. मागच्या वेळी आलो तेंव्हा सभामंडप आणि रस्त्याची मागणी ग्रामस्थांनी केली होती त्यापैकी सभामंडपाचे काम पूर्ण केले आहे. या ठिकाणी दूरदूरवरून भाविक येतात, हे संस्थान तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात यावे असा प्रस्ताव देण्यात यावा असे ग्रामस्थांना सांगितले होते. विकासासाठी आपण नेटाने प्रयत्न करत असून या संस्थानच्या विकासामुळे आपल्या गावचं महात्म्य वाढणार आहे. भाविक या नात्याने आपण नेटाने प्रयत्न करत असल्याचे सांगून या गावाला येणार्या रस्त्याचे काम देखील लवकरच मार्गी लागणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी गावचे सरपंच रोहीदास वायभट, नारायण वायभट, विष्णू जागडे, सुरेश माने, बंडू जागडे यांच्यासह भाविक भक्तांची उपस्थिती होती.

# नारळी सप्ताहाच्या परंपरेला मुर्त स्वरूपासह वैभव देण्याचे काम बंकटस्वामींनी केलं-महंत हभप लक्ष्मण महाराज मेंगडे

## अध्यात्माच्या शिस्ती चे वैभव संत बंकटस्वामी महाराजांच्या नारळी सप्ताहात पाहायला मिळाले - मनोज जरांगे पाटील



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ एप्रिल**

नारळी सप्ताहाच्या परंपरेला मुर्त स्वरूपासह वैभव देण्याचे काम बंकटस्वामींनी केलं.. असे प्रतिपादन लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले.. वारकरी संप्रदायाचे भक्ती सूर्य महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ७२ व्या फिरत्या नारळी सप्ताहाची बीड तालुक्यातील सावरगाव घाट गावात लाखो भाविक भक्ताच्या उपस्थितीत थाटात सांगता झाली.कालाच्या कीर्तन प्रसंगी ते बोलत होते.

या यावेळी प्रमुख उपस्थिती मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील, गंगाधर नाना काळकुटे, हनुमान मुळीक,ह भ प रामहरी महाराज डंबरे, भीमसेन महाराज भोसले,श्री ह भ प नाना महाराज कदम, ह भ प सुरेश महाराज जाधव, श्री हरिदास भाऊ जोगदंड,श्री ह भ प विष्णुपंत लोंढे गुरुजी, श्री ह भ प वसंत महाराज शिंदे, श्रीनिवास महाराज जगताप, श्रीकृष्ण महाराज यादव ,श्री ह भ प अच्युत महाराज घोडके, दिनेशानंद महाराज शास्त्री, ,श्री ह भ प योगेश महाराज जोगदंड , भारत बाप्पा काळे, बडगे बापू, सखाराम मस्के,अशोक शिंदे ,कालिदास आप्पा पाटील,यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

बीड तालुक्यातील मौजे सावरगाव घाट येथे श्री गुरू बंकटस्वामी महाराज यांचा वै. संत सुदामदेव महाराज यांनी सुरू केलेला ७२ व्या फिरत्या नारळी सप्ताहाची थाटात सांगता झाली. सात दिवस महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार यांचे कीर्तने झाली. रामायणाचार्य प्रा. नाना महाराज कदम यांचे सुंदर तुलसी श्री राम कथा संपन्न झाली.त्याबरोबरच ज्ञानेश्वरी पारायन, गाथा भजन, कीर्तन प्रवचन आदी कार्यक्रमाची रेल चेल होती. सोमवारी सकाळी दिंडी नगर प्रदक्षिणा नंतर काल्याच्या कीर्तनाला सुरुवात झाली. यावेळी जगतगुरु तुकाराम महाराज यांच्या गवळणी पर अभंगावर मेंगडे महाराज यानी चिंतन मांडले.

गौळीयाची ताकपिरें ।
कोण पोरें चांगलीं ।।१।।
येवढा त्यांचा छंद देवा ।
काय सेवा भक्ती ते ।।ध्रु.।।
काय उपास पडिले होते ।
कण्याभोंवते विदुराच्या ।।२।।
तुका म्हणे कुब्जा दासी ।
रूपरासी हीनकळा ।।३।।

पुढे बोलताना महाराज म्हणाले की. महाराष्ट्रात नारळी सप्ताह ही खूप मोठी परंपरा आहे बंकटस्वामी महाराज याच्या सर्व शिष्य मंडळीनी फिरत्या सप्ताहाच्या माध्यमातून संपूर्ण समाज एकत्रित करण्याचे खूप मोठे काम केले. संत बंकट स्वामी महाराज यांनी नारळी सप्ताहाच्या परंपरेला मूर्त स्वरूपासह वैभव देण्याचे काम केले.. त्यामुळेच आज संपूर्ण महाराष्ट्रातील गोड आणि फळांची नारळी सप्ताह भव्य दिव्य प्रमाणात होतात..

राजसत्ता ही धर्म सत्तेच्या मार्गदर्शनाने चालली पाहिजे.तर सुसमाज निर्माण होवून शकेल असे विचार मांडले. राग लोभ आणि भांडण बाजूला ठेवून अध्यात्मा बरोबर ऐक्यने राहण्याचा मार्ग ही सांगीतला. कीर्तनानंतर जरांगे पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी ७३ व्या नारळी सप्ताहाचा नारळ मान्यवर मंडळी च्या उपस्थितीत मौजे गावकरी मंडळी मांडवखेल ता.जि.बीड या ठिकाणी देण्यात आला. कीर्तनानंतर गावकरी मंडळी सावरगाव घाट यांच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला. श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शन व गावकऱ्यांच्या सहकार्याने विविध विधायक कार्यक्रम आयोजित करण्यात आले...यावेळी बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व गुनीजन टाळकरी महाराज मंडळीची उपस्थित होती.

# आज जिल्हा गुंतवणूक परिषद उद्योगमंत्री उदय सामंत यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ एप्रिल**

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली उद्या जिल्हा गुंतवणूक परिषद होत आहे. ही परिषद येथील ग्रँड यशोदा हॉटेल, बार्शी नाका येथे सकाळी १०.०० वाजता याचे उद्घाटन होईल.महाराष्ट्रातील जिल्हयांना सक्षम बनविणे आणि गुंतवणूक आकर्षित करण्यास चालना मिळावी यासाठी राज्यातील सर्व जिल्हयात उद्योग संचलनालय आणि जिल्हा उद्योग केंद्रामार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

उद्या होणाऱ्या या परिषदेस विकास आयुक्त (उद्योग), अध्यक्ष मैत्री दिपेंद्रसिंह कुशवाह तसेच जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.यात उद्योजक तसेच इतरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सहसंचालक बी.टी. यशवंते आणि जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव यांनी केले आहे.

# गेवराईत पत्रकाराचे घर फोडले
## सत्तर हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास

**गेवराईत चोरट्यांचे पोलिसांसमोर आव्हान**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ एप्रिल**

घरात कोणी नसल्याचा फायदा घेत पत्रकाराचे घर फोडून सोन्याचांदीच्या दागिन्यांसह नगदी रोकड असा एकूण सत्तर हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना मंगळवारी पहाटेच्या सुमारास ताकडगाव रोड, केशरदीप निवास गेवराई येथे घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास गेवराई पोलीस करत आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई शहरातील मतिमंद निवासी विद्यालय,गेवराई येथील पत्रकार विनोद नामदेव पौळ रा. सुशी (व), हल्ली मुक्काम ताकडगाव रोड केसरदीप निवास गेवराई हे पत्नी व मुलांसह गेल्या सहा-सात वर्षांपासून गेवराई येथे राहतात तर दि.७ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३.३० वा. चे सुमारास पत्नीस शारदा हॉस्पीटल, गेवराई येथे प्रस्तुतीसाठी अँडमीट केल्याने घराला कुलूप लावून दवाखाण्यात गेले होते. दरम्यान दि.८ एप्रिल २०२५ रोजी रात्री ९.३० वा.चे सुमारास घरी आले असता घराच्या दरवाजाला असलेला कोंडा कटरच्या सहाय्याने कट करुन दरवाजा अर्धवट उघडा असल्याचे दिसून आले त्यानंतर घरात प्रवेश करुन पाहीले असता घरातील पसारा अस्ताव्यस्त पाहताच घरात चोरट्यांनी चोरी केल्याचे निदर्शनात आले. दरम्यान घरातील कपाटाचा दरवाजा तोडून आतील साहित्य अस्ताव्यस्त फेकलेले दिसले.त्यांनी ताबडतोब या घटनेची गेवराई पोलीस ठाण्याला माहिती दिली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून कपाटातील लॉकर मधील सोन्याचांदीचे दागिने व नगदी रोख रक्कम असा एकूण एकोंसत्तर हजार तीनशे तीस रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याचे दिसून आले. दरम्यान याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात कलम ३०५ (ए), ३३१ (४) भा. न्या. स.नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास गेवराई पोलिस ठाण्याचे पो.नि.प्रविणकुमार बांगर, स.पो.नि. संतोष जंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल धन्यपाल लोखंडे हे करत आहेत.

# युनियनच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे-आ.विजयसिंह पंडित

**भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना युनियनच्या वतीने अभिवादन**



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ एप्रिल**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शाहू महाराज ऑटो रिक्षा युनियन गेवराई यांच्या वतीने अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी आ. विजयसिंह पंडित हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक शाम येवले, विकास गायकवाड, शेख बाबा, पप्पू पठाण,वसीम फारूकी, राजु पठाण, प्रभाकर भालशंकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य एका समाजापुरते मर्यादित नाही तर सबंध देशातील लोकांना एक संघ ठेवण्याचे काम त्यांच्या विचारांनी केले आहे. त्यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच आपण वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी झालो आहोत. आज मी आमदार या संविधानिक पदावर आहे हे त्याचेच फलित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार आपल्याला पुढे घेऊन जायचे आहेत. रिक्षा युनियनच्या पाठीशी मी मागे ही होतो आणि यापुढेही राहील. आपल्या काही समस्या असतील, अडचणी असतील तर त्या सोडवण्याचा मी प्रयत्न करेल असेही ते यावेळी म्हणाले.याप्रसंगी छत्रपती शाहू महाराज ऑटो रिक्षा युनियन अध्यक्ष सतीश प्रधान, उपाध्यक्ष धर्मा पवार, सचिव नामदेव पवार, कोषाध्यक्ष भोला शंकर सुतार, सतीश राठोड, शेख खाजा, महात्मा धूले, शेख राजू , संतोष पवार, विशाल सुतार, अमर भाई, रोहिदास पवार, सरकार जाधव, ससाने, राम शिंदे, अप्पा मस्के, संदीप काळे, संभा शिंदे, गुजारे अक्षय शिंदे, संदीप सुतार आदी रिक्षा युनियनचे पदाधिकारी व सदस्य यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष प्रधान यांनी केले.

# सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाल चिखल आक्रोश आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ एप्रिल**

दुष्काळ , अवकाळी पाऊस नापिकी या अस्मानी संकटासोबतच शेतीमालाला भाव नसणे , सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या सुलतानी संकटाचा सामना करावा लागत असुन शेतीमालाला हमीभाव नसुन उत्पादन खर्च अधिक आणि उत्पन्न कमी असुन सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी एका एकरात तब्बल दीड लाख रुपये खर्च करून आलेलं टोमॅटो पिक विक्रीसाठी परवडत नसल्याने झाडावरचं शेतात खराब होऊ लागले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळावी आणि शेतकऱ्यांप्रती वारंवार असंवेदनशील वक्तव्य करणाऱ्या कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१५ मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात टोमॅटो तुडवत लक्ष्यवेधी लाल चिखल आक्रोश आंदोलन करण्यात आले.जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक ढास,शेख युनुस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, प्रदीप औसरमल, गौतम कोरडे,आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे आदी सहभागी होते.अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करत शेतकरी शेती करतो. त्यातही वाढलेल्या खत बियाणे, युरीया आणि फवारणीच्या औषधांच्या वाढत्या किंमती,मजुरीच्या दरात वाढ,वाहतुकीचा खर्च करून पिकविलेल्या मालाला कमी भावात बाजारात विकावे लागते.नाईलाजाने शेतकऱ्यांना कमी किंमतीत शेतमाल विकुन आर्थिक नुकसान सहन करावे लागते.यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकटाचा सामना करण्याची वेळ आली आहे. सरकारच्या धोरणांमुळे शेतीमालाला भाव मिळत नसुन शेतकऱ्यांवर अन्याय होत असुन नापिकीमुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे.यातुन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल शेतकरी उचलत आहेत.शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत.सरकारची ऊदासीनता याला जबाबदार असुन शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे मुश्किल झाले आहे.सरकारचे आर्थिक धोरण शेतकऱ्यांना मारक ठरत आहे.शेतक-यांच्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळावा यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

## नवगण राजुरी येथे शुक्रवारी जंगी कुस्त्यांचे सामने

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ एप्रिल**

येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सय्यद जानपीर उरूस निमित्त शुक्रवार दि.१८ एप्रिल रोजी जंगी कुस्त्यांच्या सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे.सय्यद जानपीर उरूस निमित्त नवगण राजुरी येथे बुधवार दि.१६ रोजी संदल आणि भव्य मिरवणूक निघणार आहे. गुरूवार दि.१७ रोजी ताजी यात्रा व शुक्रवार दि.१८ एप्रिल रोजी जंगी कुस्त्यांचे सामने होणार आहेत. या कुस्त्यांच्या हंगामात अनेक मोठमोठ्या कुस्त्या होणार आहेत. कुस्ती विजेत्या मल्लास बक्षीस देण्यात येणार असून नामांकित कुस्ती विजेत्यास श्री गजानन सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन रविंद्र क्षीरसागर यांच्या हस्ते रोख २१०००/- रू बक्षीस देण्यात येणार आहे तरी या कुस्त्यांच्या हंगामास जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील कुस्तीगीर मल्लांनी सहभागी व्हावे असे आवाहन सय्यद जानपीर उरूस कमिटी नवगण राजुरी यांनी केले आहे.



सहयोग नगर,बीड येथे डॉ.हेडगेवार सार्वजनिक वाचनालयात बीड विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनंम्र अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली प्रतिमेचे पूजन डॉ.अभिषेक नागरगोजे यांनी केले तर वाचनालयाचे कार्यवाहक नंदकिशोर झरिकर, रविंद्र देशमुख, यांनी पुष्पहार अर्पण केला त्यावेळी डॉ.अभिषेक नागरगोजे व प्रमोद कुलकर्णी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन कार्याला उजाळा दिला व मार्गदर्शन केले. त्या वेळी डोंरले काका, डॉ.प्रबुध्द माने, अशोक सातपुते, साहिल वडमारे, वाचनालयाचे कर्मचारी सुरेश जाडे व पदधिकारी,वाचनप्रेमी इत्यादी. उपस्थित होते ग्रंथपाल रमाकांत शेरकर यांनी सर्वांचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणुका



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ एप्रिल**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सोमवारी संध्याकाळी येथील डॉ आंबेडकर चौकातून भव्य मिरवणुका काढण्यात आल्या. या मिरवणुकांमध्ये ढोल ताशे, डीजे यांच्या तालावर तरूणाई थिरकत असतांना दिसली. यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव, महिला उपस्थित होत्या.

येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात सकाळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांनी पूर्णाकृती पूतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर शहरातील जवळपास २० मंडळांनी शहरातून भव्य मिरवणुक काढल्या. शहरातील महात्मा गांधी चौक, जवाहर रोड, रिसाला बाजार, जिजामाता नगर, गंगा नगर, वंजारवाडा या भागातून मोठ्या संख्येने महिला, पुरूष आणि तरूणांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमेचे पूजन करीत भव्य मिरवणुका काढल्या. या मिरवणुका मुख्य बाजारपेठेत आल्यानंतर गांधी चौक, आंबेडकर चौक येथे ढोल ताशे तसेच डीजे यांच्या तालावर विद्युत रोषणाई करीत मोठ्या प्रमाणात तरूणाई थिरकतांना दिसत होती. यावेळी विविध सामाजिक संघटनांच्यावतीने मिरवणुकीत सहभागी लोकांना नाश्ता, चहा तसेच थंडपेये यांचे वाटप करण्यात येत होते. शहरातील गांधी चौक आणि डॉ आंबेडकर चौकात मिरवणुका पाहण्यासाठी समाजबांधवांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पोलिस विभागाच्यावतीने चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे वेळीच आग आली आटोक्यात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ एप्रिल**

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक परिसरात एका दुचाकीला सोमवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास आग लागली होती. मात्र पोलिसांनी वेळीच समयसूचकता दाखवत दुचाकीवर जारचे पाणी टाकत आग आटोक्यात आणली. विशेष म्हणजे याच वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणुका येत होत्या. पोलिसांच्या सतर्कतेने मोठी दुर्घटना टळली.

हिंगोली शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी डीजेच्या तालावर मिरवणुका काढण्यात आल्या. सायंकाळच्या सुमारास विविध भागातून निघालेल्या मिरवणुका डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा भागात येत होत्या. त्यामुळे या परिसरात मोठी गर्दी होती. अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस बंदोबस्तही होता. ठिकठिकाणी पोलिस कर्तव्य बजावत होते. रात्री ८ वाजेच्या सुमारास अचानक एका दुचाकीला आग लागली. आग लागलेल्या दुचाकीच्या समोर अनेक दुचाकी होत्या. शिवाय याच वेळी या मार्गावरून एक मिरवणूक येत होती. आग वेळीच आटोक्यात आणली नाही तर इतर दुचाकीही आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्याची शक्यता होती. मात्र याच वेळी कर्तव्यावर असलेल्या पोलिसांनी समयसूचकता दाखवत जारमधील पाणी आग लागलेल्या दुचाकीवर ओतण्यास सुरूवात केली. काही वेळातच ही आग आटोक्यात आली. पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळण्यास मदत झाली.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मानवंदना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ एप्रिल**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंगोलीच्यावतीने सकाळी हिंगोली नगर कार्यवाह, जिल्हा सह कार्यवाह आणि पूर्ण जिल्हा कार्यकारिणी आणि अनेक स्वयंसेवकांनी बँड पथक ची धून ने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मान वंदना दिली तसेच पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



सर्व प्रथम महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्याला फुल माला अर्पण करण्यात आला त्यानंतर संघ स्वयंसेवक यांनी आपल्या बँड पथक चे धून ने त्यांना मान वंदना दिली. यावेळी संघाचे जेष्ठ कार्यकर्ते अशोक लोहगांवकर, बंडाळे काका, वामनराव पवार, महेश बियाणी, अशोक डुब्बेवार, सुदाम गवळी, राघवेंद्र शिराडकर, गजाननसिंग ठाकूर, शैलेश सोमाणी, सुमित महाजन आणि अनेक स्वयंसेवक उपस्थित होते. यानंतर समरसता मंचचेवतीने पेयजलची सेवा देण्यात आली.



**हिंगोली– शहरातील अतिप्राचीन असलेल्या जवाहर रोडवरील श्री बद्रीनारायण मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला. यावेळी श्री बद्रीनारायण यांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी श्री बद्रीनारायणाच्या मूर्तीची विधीवत पूजा, आरती करून प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी यजमानांसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी शहरातून कलश यात्रा काढण्यात आली. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### वृत्तपत्र विक्रेता संघातर्फे डॉ आंबेडकर जयंती



हिंगोली– येथील वृत्तपत्र विक्रेता संघटना तर्फे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विक्रेता संघटनाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र हलवाई, जेष्ठ विक्रेता एकनाथ पाचमासे, सावळे, हरीश कीर्तीवार, संदीप पाचमासे, काशिनाथ कदम गजानन तळवणकर, माणिक पंडित, दिलीप अपूर्वा, जावेद शेख जावेद पठाण, राघोजी टापरे, पांडू भोयर आदींची उपस्थिती होती.

### मानव अधिकार समितीतर्फे महामानवास अभिवादन



हिंगोली–डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मानव अधिकार संरक्षण समिती जिल्हा हिंगोली यांनी ॲड राजेंद्र अग्रवाल यांच्या कार्यालयात पुष्पहार अर्पण करून सभा घेऊन जयंती साजरी करण्यात आली. सभेत अध्यक्ष ॲड. राजेंद्र अग्रवाल, कार्याध्यक्ष राऊत, संपर्क प्रमुख हेबाडे, फुलतांबकर, गव्हाणकर, राजुलवारसर, रटकलकर, ठाकरे, घोडेकर, खडसे, खडसे, कायदीय सल्लागार ॲड खरटमोल व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी कार्यालयात जयंती साजरी

हिंगोली–भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक नागेश बोलके, नायब तहसीलदार डी. एस. जोशी, संतोष बोथीकर, सी. आर. गोळेगावर तसेच मि. श्री. वाकळे, धनराज निमजे, आम्रपाली चोरमारे यांच्यासह विविध कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेतील कर्मचाऱ्यास अज्ञाताकडून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ एप्रिल**



शहरातील शासकीय विश्रामगृहासमोरील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत विड्रॉल स्लीप देण्याच्या कारणावरून बँकेतील एका कर्मचाऱ्यास अज्ञातांनी मारहाण केली असून पोलिसांना माहीती मिळताच घटनास्थळी पोलिस दाखल झाली होती.

येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सध्या शेतकऱ्यांचे पीकविमाचे पैसे खात्यात जमा झाले आहेत. सदरील रक्कम उचलण्यासाठी मागील आठवड्यापासून बँकेत आणि बँकेच्या परिसरात शेतकरी सकाळपासूनच रांगा लावीत आहेत. या बँकेत कर्मचारी वर्ग अपुरा आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत आहे. सलग तीन दिवसांची सुट्टी आल्यामुळे बँक बंद होती. आज अचानक मोठ्या संख्येने खातेदार शेतकरी बँकेत सकाळपासूनच रांगा लावून बसले होते. बँकेच्या व्यवस्थापनकांनी ७०० शेतकऱ्यांना विड्रॉल वाटप करून त्यांना रांगेत उभे केले होते. परंतु अचानक काही कार्यकर्ते बँक परिसरात आले आणि त्यांनी विड्रॉल मागितला. यावेळी येथील कर्मचाऱ्याने त्यांना विड्रॉल देण्यास मनाई केली. त्यावर कर्मचाऱ्यास शिवीगाळ करीत मारहाण करण्यास सुरूवात केली. या मारहाणीमुळे बँकेत एकच गोंधळ उडाला. अखेर पोलिस आणि बँक व्यवस्थापकांनी मध्यस्थी करीत बँकेचे व्यवहार पूर्ववत सुरू केले.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग, आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ एप्रिल**

सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात मुलीचा पाठलाग करून मी तुझ्यावर प्रेम करतो असे म्हणत मुलीचा विनयभंग करून तिच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या एका तरूणावर रविवारी दि १३ एप्रिल रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी तरूणाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशीही करण्यात आली.

सदरील अल्पवयीन मुलगी तिच्या मामाकडे शिक्षणासाठी राहते. तिचे आई-वडील दुसऱ्या गावाला कामाला असल्यामुळे ती मागील काही वर्षापासून मामाकडेच राहते. सदर मुलगी शिक्षणासाठी व खरेदीसाठी जात असतांना शुभम वाघमारे नावाचा तरूण तिचा पाठलाग करीत होता. मात्र त्या मुलीने त्याच्याकडे दुर्लक्ष केल्यानंतरही शुभम तिचा पाठलाग करीत मी तुझ्यावर प्रेम करतो, मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहे असे म्हणत तिला वारंवार त्रास देत होता. या प्रकारामुळे सदर मुलगी घाबरून गेली. सदर प्रकार तिने तिच्या कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर तिच्या कुटुंबियांनी शुभम याच्या घरी जाऊन त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता त्याने मुलीच्या कुटुंबियांनाच जीवे मारण्याची धमकी दिली. यामुळे घाबरलेल्या मुलीच्या कुटुंबियांनी रविवारी दि १३ एप्रिल रोजी रात्री उशिरा थेट सेनगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी शुभम वाघमारे याच्याविरूध्द पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिस निरीक्षक शालीनी नाईक, उपनिरीक्षक एम जी सोनकांबळे, जमादार सुभाष चव्हाण यांच्या पथकाने रात्रीच शुभम यास ताब्यात घेतले. त्याची अधिक चौकशी करण्यात आली असून पुढील तपास उपनिरीक्षक सोनकांबळे करीत आहेत.

# आदर्शमध्ये भारतरत्न डॉ आंबेडकर जयंतीनिमित्त सामाजिक सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ एप्रिल**



येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासन समाजकल्याण विभाग, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, विभागीय शिक्षण संचालक, नांदेड यांच्या पत्रान्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती दिनी करण्यात आले.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच व्याख्याते म्हणून प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. या प्रसंगी उपप्राचार्य प्रो. डॉ. संजीवकुमार नरवाडे, क. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. सुरेंद्र साहू, पर्यवेक्षक प्रा. धनंजय जोशी, कार्यालयीन अधीक्षक दिलीप दुबे, कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रो. डॉ. शत्रुघ्न जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर प्रमुख व्याख्याते प्रो. डॉ. शत्रुघ्न जाधव यांनी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे सामाजिक कार्य या विषयावर उपस्थितांचे उदबोधन केले. त्यांनी सांगितले की ब्राह्मण्य आणि ब्राह्मणवाद यामध्ये फरक असून महात्मा ज्योतिबा फुले यांनी ब्राह्मणवादाच्या विरोधी लढा उभारून खऱ्या अर्थाने समाजामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. याचा सर्वाधिक लाभ हा महिलांना झाला असून या त्यांच्या लढ्यामध्ये ब्राह्मण महिला देखील सहभागी होत्या. मुलींसाठी जी शाळा चालू केली त्यामध्ये सर्वाधिक ब्राह्मण मुली होत्या.

यानंतर प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी भारतीय संविधानाची निर्मिती, संविधान निर्मिती समिती व नागरिकांचे मुलभूत अधिकार आणि कर्तव्य या विषयावर उपस्थितांना उदबोधित केले. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान असून विस्तृत आणि जगातील सर्वोत्तम असे आहे. प्रत्येक माणसाचा अधिकार, स्वातंत्र्य शाबित ठेवण्याची कार्य भारतीय संविधान करते. भारतीय संविधान निर्मितीमध्ये मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहकार्य सात सदस्य जरी असले तरी उर्वरित सहा सदस्य कोणत्या ना कोणत्या कारणाने संविधान सभेपासून दूर होते आणि संपूर्ण जबाबदारी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर येऊन पडली. त्यांनी प्रत्येक गोष्टीचा बारीक आणि समग्र विचार करून ३९५ कलमाचे संविधान तयार केले. संविधान सभेच्या ११ सभा झाल्या. भारतीय संविधान आणि अमेरिकेचे संविधान यामध्ये मूलभूत फरक असून भारतातील कोणत्याही राज्याला देशापासून वेगळे होता येत नाही हे आपल्या संविधानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. तसेच भारतीय संविधानामध्ये प्रत्येक नागरिकाला न्याय मागता येतो व मूलभूत चौकटीमध्ये कोणताही बदल करता येत नाही असे याप्रसंगी आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे यांनी केले. सदरील कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक वृंद यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. रामेश्वर देव्हाडे, प्रा. डॉ. अण्णाजी मडावी, बंडू ठाकूर, संजय राठोड, शेख जावेद, जीवन मोरे इत्यादींनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



नांदेड- शहरातील देगलुर नाका परीसरातील बरकत कॉम्पलेक्स जवळ असलेल्या मा कुलरच्या गोदामाला आग लागुन लाखोंचे नुकसान झाल्याची घटना आज मंग्हवारी घडली. अग्नीशमन दलाने जवळपास तासळर प्रयत्न करुन आग विझवली.

# पाण्याच्या शोधात निघालेल्या हरणाचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू

## वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**हदगाव दि.१५ एप्रिल-**

हदगाव शहरातील तामसा रोडवर हृदय पिळवून टाकणारी घटना घडली असून पाण्याच्या शोधात निघालेल्या हरणाचा व त्याच्या पिल्लू ( पाडस) यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत जागीच मृत्यू झाला असून वनविभागाच्या दुर्लक्षामुळे ही घटना घडली असल्याचे वन्यजीवीप्रेमी कडून आरोप होत आहे तरी गेंड्याची कातडी पांगरलेल्या व नेहमीच वादाच्या भोवऱ्यात असणाऱ्या वन विभागाचे कर्मचाऱ्यांवरती कोणाचाही अंकुश नसल्याकारणाने याचा नाहक फटका मात्र वन्य प्राण्यांना भेटत त्यांचा विनाकारण जीव जात असल्याची ओरड या निमित्ताने होत आहे.

हदगाव तालुक्यास वन व जंगले मोठ्या प्रमाणावर असून याचे संवर्धन व वन्य प्राण्यांची काळजी घेण्याकरिता वनविभाग हे कार्यरत असते पण त्यास हदगाव वन विभाग अपवाद ठरत असल्याचे वनप्रेमी कडून नेहमीच ओरड होत असते वन विभागामार्फत वन्य प्राण्यांसाठी उन्हाळ्यात पिण्याचे पाण्याची सोय व्हावी यासाठी शासनामार्फत मोठ्या प्रमाणावर निधीची व्यवस्था केली जाते पण त्या निधीला सुरुंग लावण्याचे पाप या वन विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून होत असल्याचे आरोप होत आहे त्यामुळेच की काय आज पाण्याच्या शोधात निघालेल्या हरणाच्या व त्याच्या पिल्लू पाडस यांचा मृत्यू झाल्या त्या कारणाने वनविभागाचा गळथान कारभार समोर आला असून वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांनी या गंभीर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन योग्य कारवाई करून वन्यजीव यांच्यासाठी पिण्याची पाण्याची व्यवस्था आपल्या अधिकार कक्षेत घेऊन करावी अशी प्रखर मागणी वन्यजीव प्रेमी कडून होत आहे.



# पत्रकार पवन जगडमवार यांना समाज परिवर्तन पुरस्कार प्रदान

**तभा वृतसेवा**
**नांदेड दि.१५ एप्रिल-**

पत्रकारीतेच्या माध्यमातून उपेक्षित समाज घटकासाठी उल्लेखनीय कामगिरी करत असल्याबद्दल पत्रकार पवन जगडमवार यांना राहूल लोहबंदे मित्र मंडळाच्या वतीने यावर्षीचा समाज परिवर्तन पुरस्कार देवून गौरविण्यात आला.

क्रांतिसुर्य ज्योतीराव फुले व विश्वभुषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त दि १४ एप्रिल रोजी मुखेडचे तहसिलदार राजेश जाधव, मराठवाडा भुषण डॉ. दिलीप पुंडे व माजी नगरसेवक राहूल लोहबंदे यांच्या हस्ते पत्रकार पवन जगडमवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी माजी जि.प.सदस्य दशथराव लोहबंदे,मुखेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक लक्ष्मणराव केंद्रे, रियाज चांदपाशा शेख,पत्रकार अनिल कांबळे,जयराज गायकवाड,नागेश चल्लावाड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### बारड येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात आंबेडकर जयंती साजरी

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील बारड येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड द्वारा संचलित स्वातंत्र्य सेनानी राजारामबापू विद्यालय व श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ एप्रिल भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुबेवार यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. यावेळी नारायण सावंत, परशुराम माने, मनोहर गोळेगावकर, सावंत मॅडम, गोकुळ चव्हाण, कैलाश कपाटे, मनोहर ओसावार, गजानन भोसले, शिवप्रसाद चेडगुलवार, गजानन वाळके, बोरीवली मॅडम, पाटील मॅडम, आठवले बाई,संतोष पवार, सयाजी कांगुलकर,यासह आदि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**आदमपूर-** बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील बसस्थानक परिसरात स्थित असलेल्या सुकन्या संगणक संस्थेत सोमवार दि.१४ एप्रिल रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार,विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन १३४ व्या जयंतीनिमित्त केंद्र संचालक तथा ग्रामपंचायत सदस्या प्रतिनिधी कपिल विठ्ठल भुरे व संगणक मार्गदर्शक अविनाश गायकवाड यांनी विद्यार्थ्यांसह डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार,पुष्पांजली व श्रीफळ वाढवून सामुहिक अभिवादन करण्यात आले.

## गंगाबाई ऱ्यापनवाड यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**नरसी दि.१५ एप्रिल-**

येथील बजरंग नगर मधील रहिवासी गंगाबाई यलप्पा ऱ्यापनवाड वय ९२ वर्ष यांच दि.१५ एप्रिल २०२५ रोजी मंगळवारी निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर दि.१६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता नरसी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. गंगाबाई ऱ्यापनवाड यांच्या पश्चात सात मुली, दोन मुल,जावाई, नातू असा मोठा परिवार आहे. त्या गुत्तेदार गोविंद ऱ्यापनवाड यांच्या आई होत तर सामाजिक कार्यकर्ते बालाजीराव मेटकर व नागेश मेटकर यांच्या आत्या होत.

# मुदखेड तालुक्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड दि.१५ एप्रिल-**

मुदखेड तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातील विविध गावात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी ठिकठिकाणी अनुयायांनी स्वातंत्र्य समता आणि बंधुता अक्षुण राखून देशाची लोकशाही वृद्धींगत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजात रुजवण्याची शपथ घेतली.

शहरातील भिमनगर, नविआबादी, अशोका नगर, रेल्वे कॉलोनी, लुंबिनी नगर, समता



नगर, येथे निळा ध्वज फडकवून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यानंतर मुदखेड शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजीत पुतळ्याच्या ठिकाणी सार्वजनिक जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भन्तेजी गगनबोधी, भन्तेजी सत्यानंद, बोधाचार्य नागोराव लोखंडे, डी जी चौदंते, बोधाचार्य प्रशांत निखाते, श्रामनेर एकनाथ तारू, धम्मदीप ढगारे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पंचशील ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सार्वजनिक भीम जयंती मंडळ पदाधिकारी विविध पक्षाचे पदाधिकारि व सामाजिक कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शिक्षण म्हणजे सामाजिक क्रांतीची आधारशीला - बा.रा. वाघमारे

**तभा वृतसेवा**
**नांदेड दि.१५ एप्रिल-**

ज्या काळात अस्पृश्यांनी, मागास जातीच्या लोकांनी शिक्षण घ्यावे, ही कल्पनाच मान्य नव्हती, त्या काळात महात्मा ज्योतिराव फुलेंनी, लहूजी साळवेंनी, शाहू महाराजांनी, सयाजीराव गायकवाडांनी, संत गाडगेबाबांनी, कर्मवीर भाऊराव पाटलांनी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक अडचणींना, संकटांना सामोरे जाऊन समाजातील सर्व घटकांना सामाजिक तत्त्वावर शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. शाळा काढल्या आणि लोकांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले, म्हणून या महापुरुषांच्या विचारातून जी काही सामाजिक क्रांती या देशाकडून आली, त्या सामाजिक क्रांतीचा पाया किंवा आधारशीला म्हणजे शिक्षण होते, असे प्रतिपादन अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सचे संस्थापक बा.रा. वाघमारे यांनी केले.

अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्राच्या वतीने कावळगाव ता. देगलूर येथे महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली, त्या कार्यक्रमामध्ये 'महापुरुषांचे शैक्षणिक कार्य' या विषयावर बा.रा. वाघमारे हे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. गणपतराव वाडेकर हे होते. पुढे बोलताना विद्यार्थ्यांनी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श समोर ठेवून अभ्यास करावा, असा सल्लादेखील बा.रा. वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी सरपंच चंद्रकलाबाई सोनकांबळे, माजी उपसरपंच बाबाराव देशमुख, वळग या गावचे उपसरपंच यशवंत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्रातील विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मण मोतेवार, मनीष वाडेकर, कपिल वाडेकर, संतोष वाडेकर, राजू वाडेकर, गणपत वाडेकर आणि हनुमंत उल्हाजी वाडेकर यांनी परिश्रम घेतले. अण्णा भाऊ साठे अभ्यास केंद्रातील शिक्षक मिथुन रुपनर यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंचशील विद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**तभा वृतसेवा**
**हदगाव दि.१५ एप्रिल-**

शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

संस्थेचे सचिव सुनील सोनुले यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष शिवाजीराव तावडे,संचालक जगदीश कदम,आदर्श विद्यार्थी वसतीगृहाचे व्यवस्थापक राजेश तुपकरी, मुख्याध्यापक बंडेवार पर्यवेक्षक



जाधव,दस्तूरकर, देशमुख,मुख्याध्यापक अजय काबरा,प्रा.राजेश घाटे परीक्षा प्रमुख जाधव आदींनी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले.

शाळेतील शिक्षिका सारिका बारसे, योगेश कदम यांनी बाबासाहेबांच्या कार्याला उजाळा दिला. प्रसिद्ध गितकार राहुल वाठोरे यांनी वामनदादा कर्डकांचे तुझीच कमाईहे सुंदर गीत गायन केले.

संस्थेचे सचिव सुनील सोनूले यांचा वाढदिवस शाळेत उत्साहात साजरा करण्यात आला,जीवनांकुर सेवाभावी संस्थेच्या वतीने मानवाडी ते पळसा दरम्यान हायवेलगत २५ वडवृक्षांची रोपे लावून सुनील सोनूले यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनातून डॉ. बाबासाहेबांचे कार्य संस्कृत विभाग प्रमुख जनार्दन देशमुख यांनी सुंदर सादर केले अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# किनवटमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विविध उपक्रमानी उत्साहात साजरी



**तभा वृतसेवा**
**नांदेड दि.१५ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त किनवट तालुक्यात सामाजिक समतेचा आणि बौद्ध मूल्यांचा सन्मान करणारा अभिवादन कार्यक्रम अत्यंत अनुशासित व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.मुख्य कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ झाला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष प्रशांत ठमके यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन सामूहिक त्रिशरण पंचशीला ग्रहण करण्यात आली. या प्रसंगी विविध सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांनी बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सार्वजनिक भीम जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विनोद भरणे, ड. किशोर मुनेश्वर, सुगत येरेकार, दादाराव कयापाक, साजिद खान, यादवराव नेम्मानीवार, श्रीनिवास नेम्मानीवार, अभय महाजन, प्रा. सुनील व्यवहारे, पोलिस उपविभागीय अधिकारी रामकृष्ण मळघणे, पो. नि. सुनील बिर्ला, बाबुराव केंद्रे, विवेक केंद्रे, संदीप निखाते, प्रमोद पोहरकर, राहुल नाईक, सुरेश पाटील, प्रदीप वाकोडीकर, संतोष सिसले, बालाजी बामणे, फिरोज तंवर, उमाकांत कऱ्हाळे, भानुदास नरवाडे,किरण पुनटकर, अनिल येरेकार, सागर शिल्लेवार, मधुकर अन्नेलवार, डॉ. अभिजित ओहोळ, अजय कदम, संतोष कनाके, श्रीकांत माने , संतोष सिरमनवार, सुनील चव्हाण पाटील आदींसह असंख्य आंबेडकरप्रेमी नागरिकांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी संविधानामुळेच आज आपण समानतेने जगू शकतो, हे अधोरेखित करत बाबासाहेबांच्या कार्याची आठवण करून दिली. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची रुजवणूक करण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला. या कार्यक्रमात ड. सुनील येरेकर,व अंकुश भालेराव यांनी उपस्थित नागरिकांसाठी खिचडी व पाणी वितरणाची व्यवस्था केली होती. या जयंती उत्सवाने संपूर्ण किनवट तालुक्यात सामाजिक ऐक्य, बौद्ध संस्कृतीचे मौल्यवान विचार आणि संविधानिक भान जागृत केले.

तालुक्यातील गावागावांमध्येही ग्रामपंचायती, शाळा व सामाजिक संस्थांच्या माध्यमातून प्रभातफेरी, व्याख्यानमाला, सामूहिक वाचन, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा अशा उपक्रमांद्वारे डॉ. आंबेडकरांचे विचार समाजात पोहोचविण्याचा प्रयत्न झाला. युवक-युवतींचा या उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

# विद्यापीठामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१५ एप्रिल-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्वागत कक्षामध्ये दि.१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. व सामाजिक समता सप्ताहाचा समारोप करण्यात आला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्रातही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे मा. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. पी. विठ्ठल, नवोपक्रम नवसंशोधन व सहचर्य विभागाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहा. कुलसचिव रामदास पेदेवाड, अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे, डॉ. पांडुरंग पांचाळ, गिरीष जोंधळे, शिवराम लुटे, उद्धव हंबर्डे, जालिंदर गायकवाड, नारायण गोरे, बंडू कांबळे, संदिप लुटे, केशव कल्याणकर, संदीप एडके, रामदास खोकले, प्रदिप बिडला, संभा कांबळे, शिवाजी हंबर्डे, बालाजी शिंदे, मारोती कदम, बबन हिंगे, संतोष जोगदंड यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



नांदेड - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त नांदेड येथील सामाजिक कार्यकर्ते सुरज सोनेकर यांच्या वतीने दिव्यांग कुटुंबांना एक महिन्याचे जीवनावश्यक धान्य किट वाटप करण्यात आले. हा उपक्रम नांदेड येथील संत गाडगेबाबा चौकाजवळील साई मंदिर परिसरात पार पडला. या कार्यक्रमाला आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद बोंढारकर, माजी नगरसेवक बाळासाहेब देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# महामानवाच्या विचारांचा जागर प्रेरणादायी : कैलास कोदळे

**तभा वृतसेवा**
**नांदेड दि.१५ एप्रिल-**

ज्यांनी आयुष्यभर अंधारात राहणाऱ्या लाखो लोकांना प्रकाश दिला, त्या महामानवाच्या विचाराचा जागर खूप च प्रेरणादायी आहे असे मत कैलास कोदळे यांनी व्यक्त केले. ते संस्कृती संवर्धन मंडळाच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, शारदानगर सगरोळी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमात प्रमुख वक्त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्याचा मागोवा घेत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या त्यांच्या मंत्राचे आजही किती सामर्थ्य आहे, हे अधोरेखित केले. भारतीय संविधानाचे शिल्पकार, पहिले कायदेमंत्री आणि सामाजिक न्यायाचे महान पुरस्कर्ते म्हणून डॉ. आंबेडकरांचे योगदान आजही प्रत्येकाला प्रेरणा देते.विद्यार्थी गीत मंचातर्फे बाबासाहेबांना समर्पित गौरवगीत सादर करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. जयंत जकाते यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बाबासाहेबांनी दिलेली जीवनमूल्ये आचरणात आणण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा कु. अनुष्का शेळके यांनी डॉ. आंबेडकरांचे संपूर्ण जीवनच आमच्यासाठी प्रेरणादायी संदेश आहे असे मत व्यक्त केले.याप्रसंगी संस्थेच्या वसतीगृह अधीक्षकपदी नव्याने रुजू झालेले श्री. नितीन येन्नावार यांचे स्वागत करण्यात आले. त्यांनी आपला परिचय देताना संस्थेच्या कार्यात सहभागी होण्याबद्दल आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन प्रमोद देशमुख, हायस्कूल व वसतीगृह विभागातील सर्व कर्मचारी, कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येथील सैनिकी विद्यालयात व प्राथमिक शाळेत ही डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रमुख वक्ते प्रा. जालिंदर वाहुळ यांनी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित साहित्याचे वाचन करावे, तसेच भारतीय संविधानाचे ज्ञान मिळवावे, असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात असिस्टंट कमांडट संतोष कल्लेवार यांनी डॉ. आंबेडकरांनी केवळ पुस्तकांच्या आधारे देशाला घडवले असे प्रतिपादन केले.

# इस्लापूर शहरासाठी पाच टँकर सुरू करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर दि.१५ एप्रिल-**

इस्लापूर येथे तिव्र पाणी टंचाई भासत आहेत. त्यामुळे नागरीकांना पाण्यासाठी दाही दिशा भटकंती करावी लागत आहे. या ठिकाणी किमान पाच टॅकरद्वारे पाणी पुरवठा करूण नागरीकांची तहाण भागवावी.अशी मागणी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे.

आमदार भिमराव केराम यांना दिलेल्या निवेदनात ग्रामपंचायत च्या वतीने उपरोक्त मागणी केली आहे. सद्यस्थितीत कडक उन्हाळा तापत आहे. जवळपास सर्वच ठिकाणच्या नैसर्गिक पाणवठ्याचे बाष्पीभवन झाले आहे. इस्लापूर येथे सार्वजनिक पाणीपुरवठा नळ योजना सहस्त्रकुंड येथून करण्यात येते. परन्तु सहस्त्रकुंड येथे पाणीच नाही. पाणी सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. पाण्याची नितांत गरज भासत असल्याने इस्लापूर गावांसाठी संभाव्य पाणीटंचाई



कृती आराखडा पुरवणी मध्ये समावेश करूण पाच टॅकर साठी मंजूरी देवून पाणी उपलब्ध करूण द्यावे. अशी मागणी सरपंच शारदाबाई अनिल शिनगारे, उपसरपंच निर्मलाबाई बालाजी दुरपूडे, ग्रामविकास अधिकारी शंकर गर्दसवार यांनी केली आहे.

इस्लापूर येथील कायमस्वरूपी पाणी टंचाई चा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोट्यावधी रुपयांचा विकास निधी उपलब्ध करून दिला. परंतु ठेकेदारांनी मनमानी पद्धतीने काम सुरू केले. उन्हाळ्याच्या प्रारंभावरच पाणी पुरवठा यौजनेचे काम पूर्ण होवून गावाला पाणी मिळणे अपेक्षित होते. परंतु ठेकेदारांनी संपूर्ण यंत्रणेला मॅनेज केल्यामुळे की,काय? काम अजूनही अर्धवट अवस्थेत आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात ओरड केल्यानंतरही ठेकेदारांनी आपला हेकाचालूच ठेवला. आता ग्रामपंचायत प्रशासन टॅकरची मागणी करीत आहे. हे मात्र उशीरा सुचले अशी टिप्पणी सुजान नागरीकांतून केली जात आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com




# सोयगाव तालुक्यात २३ महिलांना सरपंचपदाची संधी

## सोयगाव तालुक्यात ४६ पदाची आरक्षण सोडत जाहीर : ग्रा.पं.निवडणुकीचे वातावरण तापणार

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ एप्रिल – सोयगाव येथील पंचायत समितीच्या बचत भुवन सभागृहात मंगळवारी दुपारी एक वाजता तालुक्यातील ४६ ग्रामपंचायत सरपंचपदाची आरक्षण सोडत एका लहान मुलाच्या हस्ते चिठ्ठी काढून जाहीर करण्यात आली आहे. त्यात सर्व प्रवर्गातील २३ महिलांना सरपंचपदाची संधी मिळाली असून त्या गावांचा कारभार चालविणार आहेत. स.न.२०२५-३० या दरम्यान गठित होणाऱ्या ग्रामपंचायतीकरिता ही आरक्षणाची सोडत काढण्यात आली.यामुळे आता सोयगाव तालुक्यात ग्रामपंचायत निवडणुकीचे राजकिय वातावरण तापणार आहे.यावेळी नोडल अधिकारी म्हणून तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांनी काम पाहिले.तर त्यांना गटविकास दादाराव अहिरे यांनी मदत केली.यावेळी नायब तहसीलदार संभाजी देशमुख,सहायक गटविकास अधिकारी तात्याराव माळी, गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव,विस्तार अधिकारी अशोक दौड,सुनील राकडे,दिपक फुसे,उज्ज्वला वामने यांची उपस्थिती होती.तालुक्यातील २४ जागा सर्वसाधारण प्रवर्गातील सरपंचपदासाठी सुटल्या आहेत.यामध्ये ही १२ महिलांना संधी मिळाली आहे यामुळे सोयगाव तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीचे वातावरण तापणार आहे.२०२५ ते २०३० या कालावधीसाठी मुदत संपणाऱ्या ४६ ग्रामपंचायत साठी ही सरपंच पदाची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे.

दरम्यान आरक्षित ग्रा. पं.सरपंचपदाच्या आरक्षण सोडतीची चिठ्ठी मुलाच्या हस्ते काढण्यात आली.

**ग्रामपंचायतनिहाय आरक्षण**

**सर्वसाधारण (१२)** फर्दापूर,वरखेडी(बु), माळेगाव, सावळदबारा, जरंडी, देवारी,पहुरी (बु),वाडी सुतांडा,वरखेडी(खु),बहुलखेडा, नांदगाव, मोहळाई,

**सर्वसाधारण महिला (१२)** आमखेडा, पळसखेडा, किन्ही, वनगाव, वरठाण, बनोटी, डाभा, निंबायती, जंगलीकोठे, गलवाडा(सो,), कंकराळा, दस्तापुर,


**नागरिकांचा मागास प्रवर्ग (६)** निंभोरा,वडगाव(ति), गोंदेगाव, रवला, पळाशी, सावरखेडा,

**नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला (६)** नांदा तांडा,तितुर, टिटवी, कवली, पिंपळ वाडी, तिडका,

**अनुसूचित जाती (२)** मोलखेडा, जंगलातांडा या दोन ग्रामपंचायती अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सुटल्या असून अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी निमखेडी आणि शिंदोल या ग्रामपंचायती राखीव झाल्या आहे.

अनुसूचित जमाती साठी घोसला,वाकडी आणि जामठी या तीन ग्रामपंचायती महिलांसाठी राखीव झाल्या तर हनुमंतखेडा,उप्पलखेडा,घानेगाव तांडा या तीन ग्रामपंचायती अनुसूचित जमाती सर्वसाधारण प्रवर्ग पुरुषांसाठी सुटल्या आहे.

## एमजीएमच्या कुदसिया तांबोळी यांना पीएचडी प्रदान



छत्रपती संभाजीनगर, दि. १५ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बेसिक अँड अप्लाइड सायन्सेसच्या भौतिकशास्त्र विभागाची विद्यार्थिनी कुदसिया यासीनअली तांबोळी यांना पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. कुदसिया यांनी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, संचालक डॉ. अण्णासाहेब खेमनर, इमॅरटस प्रा.के.एम.जाधव व सर्व संबंधितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (९१) राष्ट्रधर्म

हिंदूंची संघटना करण्यासाठीच रा.स्व. संघाची स्थापना झाली ही लपवून ठेवलेली गोष्ट नाही. श्री गुरुजी म्हणत आपल्या एखाद्याच्या घरात सात भाऊ असतील व पित्याने सर्वांना संघटित राहण्याचा आदेश दिला; तर शेजाऱ्याला आक्षेप घेण्याचे स्वातंत्र्य नाही. तसेच श्री देवरस म्हणत हम स्वयंसेवक -- न तो उग्रपंथी हिंदू है। न आक्रमण शील हिंदू है। हो स्वाग्रही हिंदू अवश्य आहे. तेव्हा देशभरात अशा हिंदूंचे संघटन ही संकुचित संकीर्ण वृत्तीची बाब होऊ शकत नाही. एकोणिसाव्या शतकापासून जे जे म्हणून समाजाचे प्रबोधन करणारे थोर पुरुष झाले, त्या सर्वांनी हिंदू समाज डोळ्यापुढे ठेवून कार्य केले आहे. संघ ही फक्त राष्ट्रीय असणाऱ्यांची संघटना आहे व या देशात फक्त हिंदूच राष्ट्रीय आहेत. हिंदू संघटन करणाऱ्या संघाला दोष देणाऱ्यांना कावीळ झाली आहे. त्यांना सगळे पिवळेच दिसते. त्यात त्यांना आसुरी आनंद मिळतो. हे देवा-या विरोधकांना जेव्हा भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय संस्कृती, हे हिंदूंचेच तत्त्वज्ञान आहेत हे पटेल / कळेल तो सुदिन.

त्यामुळे त्यांना हिंदू राष्ट्रधर्माची ओळख होईल. Hindu is the name of a Nationality

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३४८५० रुपयांचा तिन किलो गांजासह आरोपी अटकेत

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १५ एप्रिल .पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील लाखेगाव येथे तीन किलो ४८५ ग्रॅम गांजा सह आरोपीस अटक. पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की आकाश कपुरचंद घुन वय ४० वर्षे रा. लाखेगांव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून बिडकीन पोलीसांनी दि १४ एप्रिल रोजी संध्याकाळी ७ वाजे दरम्यान अलीपुर ता . पैठण शिवारातील शेतातील एका पत्र्याच्या खोलीत राजरोसपणे अवैध रीतीने विक्रीसाठी ठेवलेला ३ किलो ४८५ ग्रॅम गांजा किंमत ३४८५० रुपयांचा गांजा बिडकीन पोलिसाने जप्त केला असुन पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे यांच्या फिर्यादीवरून आकाश घुन विरोधात अमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थ कायदा (एन.डी.पी.एस) कलम २०,२२ अन्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मंजीतसिंग सेना,पो कॉ.चव्हाण करीत आहे.

# प्रगत तंत्रज्ञान आले तरी हस्तलिखितांचे महत्त्व अबाधित : चित्रा जोशी

छत्रपती संभाजीनगर – कितीही प्रगत तंत्रज्ञान आले तरी हस्तलिखितांचे महत्त्व नेहमीच अबाधित राहील असे प्रतिपादन राष्ट्र सेविका समितीच्या अखिल भारतीय सहकार्यवाहीका चित्रा जोशी यांनी केले. त्या आज धुळे येथील दाते रीजन्सी इथे आयोजित सेविका अंक प्रकाशन सोहळ्यात बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष सौ. रेणुका बेलपाठक, पश्चिम क्षेत्र कार्यवाहीका श्रीमती सुनंदा जोशी आणि सेविका अंकाच्या संपादिका सौ. सुनिला चापोरकर उपस्थित होत्या.




आपल्या भाषणात चित्रा जोशी यांनी हस्तलिखित निर्मितीची प्रक्रिया किती आनंददायक आणि नवचैतन्य निर्माण करणारी असते हे उलगडून सांगितले. हातांनी निर्मिलेले साहित्य अ क्षर म्हणजेच क्षर न होणारे असते; त्यामुळे यापुढे देखील देखणी साहित्य निर्मिती करूया असे आवाहन केले.

महाराष्ट्रातील ४३ शाखांमधून लिहिल्या गेलेल्या हस्तलिखितांचे परीक्षण धुळे येथील श्री प्रकाश मुळे, सौ. उज्वला वाणी,सौ. सोनाली पाटील आणि डॉ.श्री दत्तात्रय चौधरी यांनी केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना रेणुका बेलपाठक यांनी मांजरा नदी काठी भरलेला हा हस्तलिखितांचा महाकुंभ असल्याचे सांगितले. ऐतिहासिक हस्तलिखितांचा ठेवा जपणाऱ्या धुळ्यामध्ये हा कार्यक्रम होत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. लिहित्या झालेल्यांनी कार्यप्रवण देखील व्हावे असे त्यांनी सांगितले.

परीक्षकांचे मनोगत व्यक्त करताना श्री. प्रकाश मुळे यांनी सर्वच हस्तलिखितांचा साहित्यिक दर्जा अत्यंत उच्च असल्याचे सांगितले. हस्तलिखित स्पर्धा ही समिती संस्थापिका वंदनीय मावशी केळकर यांचे विचार वृद्धिंगत करणारी चळवळ असल्याचे प्रतिपादन केले. दुसऱ्या परीक्षक सौ. उज्वला वाणी यांनी परीक्षणाचे भाग्य लाभल्याबद्दल संतोष व्यक्त केला,तसेच ललित लेख आवडल्याचे देखील त्या म्हणाल्या.

सेविका अंकाच्या संपादिका सौ. सुनीला चापोरकर यांनी प्रास्ताविकातून ही स्पर्धा आयोजित करण्यामागील उद्देश सांगितला. ५२ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेला हा उपक्रम सेविकांच्या सृजनशीलतेला चालना देणारा असल्याचे सांगितले.

तत्पूर्वी प्रकाशनासाठीचा यावर्षीचा सेविका अंक दिंडीच्या माध्यमातून वाजत गाजत पालखीतून कार्यक्रम स्थळी आणण्यात आला.

स्पर्धेच्या निकालाची घोषणा देवगिरी प्रांत कार्यवाहीका श्रीमती रत्ना हसेगावकर यांनी केले. प्रथम क्रमांक नागपूरच्या ज्योतिर्मयी आणि नाशिकच्या दीपस्तंभ हस्तलिखिताला मिळाला. पुणे येथील पश्चिमा अंकाला द्वितीय तर भंडाऱ्याच्या उषा आणि नागपूरच्या ज्ञानदाला तृतीय क्रमांक मिळाला. प्रांतशः उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आली. तसेच उत्कृष्ट मुखपृष्ठ, अंतर्गत सजावट, उत्कृष्ट हस्ताक्षर आणि शुद्धलेखनासाठी पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेवती पागे यांनी केले, वक्ता परिचय लीना पांडे यांनी केला, परीक्षकांचा परिचय कांचन पुराणिक यांनी दिला,आभार ज्योती जानवे यांनी व्यक्त केले. वैयक्तिक गीत कल्याणी पाठक यांनी तर पसायदान तेजश्री कौशिक यांनी म्हटले.

कार्यक्रमास स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाणी जपून वापरा : जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया

अहिल्यानगर दि.१४- नागरिकांना पाण्याच्या बचतीचे महत्व पटवून देण्याबरोबरच जलसाक्षरता वाढीसाठी जिल्ह्यात १५ ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' चे आयोजन करण्यात आले असून त्या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने येथील हरिभूमी प्रतिष्ठानच्या वतीने तयार करण्यात आलेल्या जल जागृती पोस्टरचे प्रकाशन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते करण्यात आले. नागरिकांनी जलसंपदा विभागाकडून उपलब्ध होणारे पाणी पेयजल काटकसरीने वापरावे याचबरोबर वाहने धुतांना, अंगणामध्ये सडा मारतांना होणारा पेयजलाचा अपव्यय टाळावा, नादुरुस्त जलवाहिन्या दुरुस्त करून घेणे, गळके नळ दुरुस्त करून घेणे आदी उपाययोजना करून पाण्याचा अपव्यय टाळावा तसेच शक्य तेवढे पर्जन्य जलाचे संवर्धन करावे

